म. ग्रं. सं. ठाणे
विषय — काव्य
सं. नं. ४५४
सन १९२८

REFBK-0003445

॥ ॐ नमश्चण्डिकायै ॥

काव्यकिरणमाला-किरण चौथा

# कविता-वनिता

लेखक

द्. आ. तिवारी जळगांव

REFBK-0003445

सं० व

मि० का० भोरटेका जळगाव

मुद्रक

नारायण नरसिंह फडणीस

बाबजी स्टीम प्रेस जळगाव

( ग्रंथकर्त्यानें सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत )

जून १९२७.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
किंमत
वा. क्र.

# प्रकाशकाचें निवेदन

कविता-वनिता

हा काव्यकिरणमालेचा चौथा किरण प्रकाशित होत असतां आह्मांस फार आनंद वाटत आहे. रसिकांच्या दृष्टीस हा निःसंशय आनंदप्रद होईल.

श्री कवि तिवारी यांच्या या कविता संग्रहांत वनिता विषयक अनेक मधुर व कोमल भावनाप्रधान कविता एकत्र करण्यांत आलेल्या आहेत. ह्मणूनच ग्रंथकारांनीं त्यास " कविता वनिता " हें नांव दिलें आहे.

वनितांचीं दर्शनें, कामिनीचे कटाक्ष व सुंदरींचे मुग्धविलास यांच्या वांचून मानवी संसार केवळ रुक्ष झाला असता. रसज्ञांनी नवरसांत शृंगाराला पहिलें स्थळ दिलें आहे ह्याचें तरी हेंच कारण होय. कवि तिवारी यांचा वीररस महाराष्ट्रास परिचितच आहे, प्रस्तुतचा संग्रह ह्मणजे त्यांच्या स्त्री विषयक विविध सुंदर भावनांचा गुच्छच होय.

या संग्रहास श्री प्रेमचंद इच्छाराम पाटील यांनीं आश्रय देऊन आपलें काव्यप्रेम व्यक्त केलें याबद्दल त्यांचे अभिनंदन करणें अवश्य आहे.

ग्रंथकर्त्यांनीं हा आल्हाददायक किरण आह्मांस प्रकाशनार्थ दिल्याबद्दल आह्मी त्यांचे आभारी आहों.

जळगांव
वट सावित्री पौर्णिमा
शके १८४९

मि० का० भोरटके

# अनुक्रमणिका.


| | |
|---|---|
| आर्यगृहिणी ... ... ... | १ |
| जिकडे पति तो, तिकडे सति ती ... | ३ |
| महाराष्ट्रिका ... ... ... | ५ |
| कल्लोलिनी... ... ... ... | ८ |
| सौंदर्य-शालिनी ... ... ... | १२ |
| ही ! ... ... ... ... | १५ |
| समाराधन ... ... ... | २२ |
| विजयी मराठा ... ... ... | २५ |
| शेवटची भेट ... ... ... | २७ |
| पतीचा अंत्य रणसंग्राम ... ... | ३० |
| वीर माता ... ... ... | ३२ |
| वीर मातेचा बंदिवान पुत्रास उपदेश ... | ३५ |
| वीर-विधवा ... ... ... | ४० |
| विनती .. ... ... ... | ४३ |
| दर्शनानंद... ... ... ... | ४५ |
| भक्तीचे अश्रू ... ... ... | ४६ |
| मुग्धा ... ... ... ... | ४८ |
| सुप्त-सखी ... ... ... | ५० |
| मानिनी ... ... ... ... | ५४ |
| भामिनी ... ... ... ... | ५७ |
| वंचना ... ... ... ... | ५९ |
| वंचनेनंतर याचना संभवत नाहीं ... ... | ६२ |
| विरहिणी ... ... ... ... | ६४ |
| वियोगिनी ... ... ... | ६८ |
| आकांक्षिणी ... ... ... | ७२ |

शेवाळ नदीच्या कांठीं ... ... ७४
तो क्षण ... ... ... ... ७७
पुष्प-क्षेप ... ... ... ... ८०
अनुताप ... ... ... ... ८२
विरस ... ... . .. ८५
विद्ध-हरिणी .. ... ... ८६
काय सांगूं ? ... ... ... ८८
स्मृति ... ... ... ... ८९
तें सुख ! ... ... ... ... ९१
विरक्त ... .. ... ... ९५
निश्वास ! ... ... ... ... ९६
मनःसान्त्वन ... ... ... १०१



श्री० प्रेमचंद इच्छाराम पाटील

# अर्पण पत्रिका.

या पुस्तकाच्या प्रकाशनाला सावदे येथील आमचे काव्यप्रेमी श्रीमंत मित्र श्री **प्रेमचंद इच्छाराम पाटील** यांनी सर्वतोपरी साह्य केलें. त्यांच्या वाङ्मयोत्तेजक गुणग्राहकतेनें हें पुस्तक त्यांस प्रेमानें अर्पण केलें आहे

**दु. आ. तिवारी**

# कविता-वनिता

## आर्यगृहिणी

जे वेदश्रुतिधर्मशास्त्र-रत या दिग्मंडळीं शोभले
यद्बुद्धिप्रभवास[1] पाहुन महाज्ञातेंहि [illegible]
गाई मंगल शारदा भगवती यत्कीर्ति आनंदुनी
देती जन्म अशास आर्यगृहिणी संकीर्तनीया[2] जनीं

२

यज्जन्मासह पारतंत्र्य रडलें, स्वातंत्र्य तें हासलें
तारुण्यासह शौर्य तें विकसलें, धैर्यासवें शोभलें
आवेशांत रणांगणें भिजविलीं ज्यानीं स्वदेशांतलीं
त्याच्याही जननीच आर्य-गृहिणी सपूज्य या भूतळीं

३

श्रीराम, प्रभु कृष्ण, भीष्म, विजयी भीमार्जुनासारखे
मेवाडाधिप तो प्रताप, शिवबा या भारताचे सखे
श्रीज्ञानेश्वर, एकनाथ, तुकया, गांधी महात्मा पहा
देती जन्म पवित्र आर्यगृहिणी रत्नास ऐशा अहा!

---

१ ज्याच्या बुद्धिवैभवास २ स्तुत्य

४

होइ जागृत सद्विचार सहजीं यद्दर्शनानें मनीं
लाभे अद्भुत तैं पवित्र सुखही जीतें समालोकुनी
चित्ताकर्षकतेंत देवि शिकवी शालीनतेचे धडे
गेहीं गेहिं इथेंच आर्यगृहिणी, तैशा न कोणीकडे

५

कोणी प्रश्न करील ' आर्यगृहिणी-चारित्र्य कैसें तरी ?'
आम्ही दृष्टि तदीय शुद्ध वळवूं गंगाप्रवाहावरी
तें पावित्र्य मनोहरत्व हृदयीं जें शांतता विस्तरी
त्यांतें एकच ती अनन्य उपमा या भारताभ्यंतरीं

६

देवा ! लक्ष्मि नको, सुधारस नको, ती कल्पवल्ली नको
कंठातील तुझ्याहि कौस्तुभ-मणी आम्हास देवा नको
तैशी ती तव कामधेनु तुझिया द्वारांतरीं राहु दे
कांहीं देउं नकोस, आर्यगृहिणी देवा ! अम्हालागिं दे.

---

१ सच्छीलतेचे

# जिकडे पति तो, तिकडे सति ती

( तोटक-वृत्त )

१

रघु–नायक कैकयिच्या वचनें
वन–मार्ग धरी अति शांतपणें
विचरे पदिं जानकि शीलवती
जिकडे पति तो तिकडे सति ती

२

पति–संकटकाल मनीं गणितां
वनिं अश्वपती–नृपती–दुहिता[1]—
निघता वदली श्वशुरा सुमती
'जिकडे पति तो तिकडे सति ती'

३

दमयंतिस कांत विपत्समयीं
वदला तुज पोंचवुं तातगृहीं ?
वदली पतिला सति धैर्यवती
'जिकडे पति तो तिकडे सति ती'

---

1 सावित्री

४

नृपराज्ञि-पदास यथोचितही
सति द्रौपदि दासि विराट--गृहीं !
परि काय करील विलासवती
' जिकडे पति तो तिकडे सति ती '

५

प्रभु-वैर कुणी करि का जगतीं ?
कथि रावणपत्नि पतीस किती ?
पति--दोष तिला जरि ना रुचती
' जिकडे पति तो तिकडे सति ती '

६

समजे पति देवचि जी महिला
अति भूषवि भारत--सन्महिला
इतरत्र अशा असती नसती
' जिकडे पति तो तिकडे सति ती '

७

मम देशनिवासिनि ज्या भगिनी
असतील सुवासिनिही सुगुणी
विसरोत न तत्व कधीं जगतीं
' जिकडे पति तो तिकडे सति ती '

# महाराष्ट्रिका.

(शा वि.)

१

दास्याची निज-जन्मभूमि-चरणीं आलोकिता शृंखला
दडाया स्फुरलीं यदीय शरिरें त्वेषांत उच्छृंखला
केल्या शौर्यबळें जयीं गिरि-गुहीं ताम्रानना भूमिका
जन्मा देउनिया अशा नरवरां गेल्या महाराष्ट्रिका

२

" प्राशी आत्मपया यथेच्छ तनया ! तज्जन्य रक्ताचिया
संग्रामांगणिं बिंदु बिंदु सजणें देशार्थ गाळावया "
ज्या स्वांकाश्रयि[1] बालकास वदती मंदस्मिता मातृका
देशोद्धारिणि विस्मृतींतुन कशा जाव्या महाराष्ट्रिका !

३

" ज्यांचें शौर्य रणांगणीं बघुनिया स्वर्गीय संतोषती
घर्माचे मुखिं बिंदु ना, वरुनि ते मोदाश्रु कीं वर्षती
त्यांचा वंशज तूं, सुता ! न मळवी, रक्षी यशोमालिका ? "
वीराच्या उपदेशिका गृहिं गृहीं होत्या महाराष्ट्रिका ?

---

१ आपल्या मांडीवरील

४

उत्कंठोच्छ्वसिताधरा[1] कर-तळीं इंद्रानना ठेवुनी
येणाऱ्या जयनादिनी निरखिती सेना गवाक्षातुनी
घेवोनी निजहस्तपुष्परचिता माला स्वकांतोत्सुका
होत्या घालित नाथ-कंठिं मधुरा मुग्धा **महाराष्ट्रिका**

५

"नाथानें मम, संगरांत पुढती केली महागर्जना!
लावोनी ध्वज मत्सखा नग-शिरीं तेथें करी घोषणा!"
वार्तोल्हादिनि चारु हास्यवदना स्वामीयशोलापिका[2]
होत्या ना चतुरा सरस्वति इथें धन्या **महाराष्ट्रिका**?

६

वृद्धेची सुत-यष्टि भग्न घडतां, 'देशार्थ गेली!' ह्मणे
कांतेचें पुसतांहि कुंकुम, 'महाराष्ट्रार्थ गेलें!' ह्मणे
गंगाभागिरथी समान विमला कल्याण-संवर्धिका
होता सेवित छत्रपाळ-नृपती प्रेमें **महाराष्ट्रिका**

---

१ ज्याच्या अधरोष्ठांतून उत्कंठेचे उच्छ्वास निघत आहेत २ पतीची कीर्ति वर्णणाऱ्या

७

ज्या गंगासलिलावगाह[1]-समयीं बद्धांजलि[2] प्राङ्मुखी[3]
शीतें[4]प्रस्फुरित–स्तनद्वयवती राष्ट्रोदयाच्या सुखीं
स्वातंत्र्योत्तम–मन्त्रगीत जपती पुण्योत्तमा देवका
ही गोदा रडते, परी न दिसती त्या त्या **महाराष्ट्रिका**

८

देवांचा पति तो शचीसच महा-साध्वी म्हणोनी रिझे
संगीतज्ञहि चित्रसेन ललना-रूपस्तुतीला सजे
दोघेही भजतात मौन, वदती वार्ता न पौराणिका
जों आल्या दिसुनी तदीय नयनीं रामा **महाराष्ट्रिका**

९

व्योमें[5]-स्पृष्ट विशाल शैल[6]-शिखरीं सौराज्य-लक्ष्मीसवें
प्रस्थापून विलोकनीय दिधलें ऐश्वर्य त्याना नवें
तन्माता-स्मृति या कृतज्ञ अचला प्रत्यब्दि[7] होऊन का–
आलिंगून पयोधरास पुसती, कोठें **महाराष्ट्रिका** ?

---

१ गोदावरीच्या स्नानसमयीं २ ज्यानीं हात जोडिले आहेत अशा ३ ज्याचें पूर्वेस मुख आहे अशा ४ थंडीनें ज्याचे स्तनद्वय कंप पावत आहे अशा ५ नभस्पर्शी ६ पर्वतास ७ प्रतिवर्षी.

# कल्लोलिनी

भग्न प्रासादाजवळून सरित्प्रवाह खळखळ वहात आहे, कालवश झालेल्या राजस्त्रियांची या नदीला स्मृति होत आहे काय ?

[ शा० वि० ]

१

सौधीं[1] बैसुन रम्य नक्तसमयीं[2] संभोगलीलावती
चंद्राचें प्रतिबिंब ज्यांत पडलें नद्योघ आलोकिती
भ्रांतीनें विधुच्या चकोर झटती यद्बिंब चुंबावया
प्रासादाजवळी नदी रडतसे, गेल्या कुठें त्या स्त्रिया ?

२

खालीं पाहत पुष्पयुक्त कबरी[3] सौगंधतैलान्विता
कंठस्पर्शसुखावह[4] प्रियकरें चाचल्य ती पावतां
पुष्पें जीं गळतीं जलीं, अलि सुखें जाती तया मागुनी
शोभाच्या[5] कबरी न, या वट--जटा येती तिथें लोंबुनी

३

देहीं लावुनिया विलास-ललना सचंदनाची उटी
कस्तूरीप्रियलेप चर्चुन तसा दोन्ही कुचाच्या तटीं

---

१ गच्चीवर २ रात्रीं ३ वेणी ४ कंठास स्पर्शसुखकारक ५ तरुण स्त्रियांच्या.

गेल्या कंठकलावती रतिसुखस्वादास सेवोनिया
तेथें का घुबडें बघून रडते कल्लोलिनी ही अहा !

४

वाराया नवकुंद[1]कांति--धवला संभोगजन्य श्रमा
तोयस्पर्श--[2]शीत वायुलहरी देहानु[3]कूलोत्तमा
होत्या सेवित त्या न आज दिसती कांचीक्वण[4]त्कारिणी
'वायो ! निष्फल वा ! विहार' वदते ही निम्नसं[5]वाहिनी

५

नेत्राशीं समता करीति नलिनी, नाशेसि चांफेकळ्या
ओष्ठाशीं उपमानता कितिकदा ताम्रां[6]बुजिनी पावल्या
गेल्या त्या उपमेय[7]--भाविनिसवें सद्वस्तुही येथुनी
'भोक्ता जेथ न तेथ सत्य वसुनी राहे न कोणी गुणी'

६

ज्याचें हास्य बघून शुभ्र कुसुमीं जाई फुलें पाहती
संतोषास बघून बंधुक--लता ताम्रानना शोभती

---

१ गौरवर्णा २ जलस्पर्शामुळें थंडगार ३ शरिरास सुखकारक ४ ज्यांच्या कटिमेखलेचा आवाज होत आहे अशा ५ नदी ६ सूर्य-कमलिनि ७ उपमा देण्यास योग्य अशा तरुणीसवें ८ हुपरी किंवा सुंदरी.

हसी वा करिणी यदीय गमना साश्चर्य आलोकिती
त्यांचा गे! करिशील द्रुग--तनये! तूं शोक लोकीं किती!

७

पायीं नूपुर ज्यांचिया कटितटीं हेमप्रभा-मेखला
मुक्ताहार पयोधरावरि, अशा भूपांगना पातल्या
स्नानामोद[2]-कषायित स्वजल हें प्रत्यूषिं[3] जैं होतसे
मोहव्यासअलि-भ्रमें कमलिनी प्रत्येक रिक्ता दिसे

८

आकाशांतिल निर्जरी[4] कर करीं अन्योन्य घालोनिया
प्रेमालाप करीत देवतटिनी--तीरांत पोहावया--
केव्हां येति, कशा सुखें विरमती त्या पाहिल्या कोणि ना
येथें स्त्री--जलकेलि मात्र बघता झाल्यास ये कल्पना

९

पातालाहुन लक्ष्मिकांत वळला स्वर्गास जैं जावया
कांतासृष्टि-कलापटुत्व विधिचें ये त्यास पाहावया
झाला संस्थित येथ तीरनिकटीं, तें विष्णुमंदीर हें.
ऐसा कोण तरी सुतोत्कटगुणा पाहून जो ना रमे?'

---

१ नदी! २ कस्तुरी चंदन वगैरे स्नानसमयीं सुगंध क्षालनानें सुगंधित ३ रोज मोठ्या सकाळीं ४ देवस्त्रिया.

१०

तो तैसाच मनोज्ञ काल सरिते ! तैशाच होत्या स्त्रिया
ज्यांनीं संगरधीर-वीर दिधले देशांत जन्मास या
होत्या सज्जनसंघ-मान्य इतुक्या त्या राष्ट्रसंजीविनी
कीं ज्यांचें स्मृतिदुःख-गीत न सरे केव्हां तुझें गाउनी

# सौंदर्य-शालिनी

( शा. वि. )

१

मोठाही घडला प्रमाद तुझिया हातें मनोमोहिनी !
हे सौंदर्यवती ! तरी विसरतों मी त्वन्मुखालोकनीं
शोभा होइल न्यून का सुमुखिची आनंदसंवर्धिनी
शकेनें बसतों प्रहात् वदनीं मौनास गे ! सेवुनी

२

त्वन्नेत्रावरुनी कुणास सुचती पद्मोपमा-कल्पना !
या ओष्ठावरुनी कुणास उठती बिंबोपमा-भावना !
चंद्राशीं कुणि तोलुनी मुख तुझें आनंदतो सत्कवी !
मातें तू गमतेस रम्य लहरी भाग्योदधीची नवी !

३

कोणी शूर असो, परंतु तुझिया येतां पुढें कामिनी !
हातीं शस्त्र न अस्त्र, तू विजयिनी होशील गे ! शालिनी !
शास्त्राभिज्ञ[1] तपोवनातिल कुणी ऋष्याग्रणी पातला
शास्त्रातीण विरुद्ध त्यास करण्या सामर्थ्य आहे तुला !

---

१ शास्त्रज्ञ

४

दु खानें मन गांजलें, अधिक जैं वाटे उदासीनता
पाहावें तव गे! मुख क्षणभरी तैं येतसे शांतता
दु:खाची हननी, सुशांति-जननी, कल्याणसंवर्धिनी
तू पुण्याचरिणी सखी, अमरिणी आहेस कीं यक्षिणी?

५

' हा संसार अतीव दु:खद ' असें तत्त्वज्ञ जैं बोलती
गे सौभाग्यवती! तुला बघुनि तैं साश्चर्य होते मती
स्वर्गाचें सुखसार तू, अनृतही वाचा बुधांची नसे
मातें या विषयांत गूढ पडलें, जाणूं तरी हें कसें?

६

सौगंधातिशयें जिला त्रिदश[1] हे तारे जणो लाहती
आला घालुनि देवनायक[2] अशी मंदारमालाहि ती
तो द्यायास सजेल नंदनवन—स्वामी मला ती जरी
हन्माला मम तूं, तुला कवळुनी हांसेन त्याला परी!

७

हसी पीनपयोधरार्त[3]-तनुशीं स्पर्धा करूं पाहती
कठाशीं करण्यास साम्य मधुरा या कोकिला बोलती

१ देव २ इंद्र ३ पुष्टस्तनभारवती.

सादृश्यांत तुझ्या मनोज्ञगमना या चालल्या हस्तिणी
एकीला समता तुझी न करिता येई मनोहारिणी !

८

सौंदर्यांत कुणी प्रसिद्ध असती, शीलात कोणी स्त्रिया
पातिव्रत्यगुणात कोणि असती विख्यात लोकात या
तू सर्वांहि गुणांत देवि ! असशी सत्कीर्तनीया सती !
" वर्णील प्रगुणी महाकवि तरी साध्वि स्त्रियेला किती ? "

९

येई वाहत मंद मंद मलयश्रेष्ठाद्रि-वायू यदा
शंका पद्मिनि ! येतसे तव मुखोच्छ्वासानिलाची तदा
जेव्हां ध्वांत-विनाशिनी प्रगटते गौरी ! शरच्चंद्रिका
साश्चर्यें बघतों कपोल तव मी, आलें तिथें हास्य कां ?

---

१ मलयापर्वतावरील वायु २ अधार

# 'ही!'

( चाल-चद्रकांत राजाची कन्या )

सरस्वतीच्या उद्यानातिल कलिका कवितेची
लक्ष्मीच्या उपवनातील ही लहरी भाग्याची ! १
पुण्याचरणी सतजनाच्या हृदयाची शांती
सूर्यवशि सच्छील नृपांच्या मुकुटाची दीप्ती ! २
साधुजनांचा साधुमार्ग, ही त्यातिल पुष्करिणी
ब्रह्मर्षींच्या हातामधली कीं पूज्य स्मरणी ! ३
भागीरथिच्या तीरावरची निसर्ग-सुदरता
यमुनेच्या जललहरींवरची चचल मोहकता ! ४
कुजविहारी कर्णविहारी वाजवितां मुरली
गोपीची तन्मयता कीं ही मूर्तरूप ल्याली ! ५
स्वातत्र्याच्या रणातील ही शौर्याची स्फूर्ती
स्वतत्रतेच्या रणभक्ताच्या आशेची पूर्ती ! ६
नैय्यायिक जे प्रमाणपटुता तद्वादातिल कीं ?
वैय्याकरणीं तद्वचनातिल सुदर घटना कीं ? ७
सत्यव्रत जो भीष्म तयाची निश्चल कीं वृत्ती ?
प्रयत्नवादी भगीरथाची कीं कार्यासक्ती ? ८
स्वर्गद्वारातील शलाका तेजाची काय ?

भूमि विदारुनि शेषमणीची प्रभा फुटे काय ? ९
गगनाच्या चौकांत चांदण्या खेळत असताना
तेजोधामांतून निखळली ही तेजोवदना ? १०
ज्योतिष्मतिच्या मुकुटावरची झळझळती कोर
सृष्टिसतीच्या सौभाग्याची मनोज्ञता थोर ? ११
प्रणयिजनांची विरहिजनाची पहिली उत्सुकता
भक्ताची आराध्यापुढची कीं ही तल्लिनता ? १२
जगच्चालक प्रभु-नेत्रांतिल अमोघ ही माया
शुक्राची चांदणी तिची ही भूवरची छाया ? १३
शकुंतलेचा तात, तयाच्या हृदयाची भरती
शकुंतलेची हरिण-किशोरावरची कीं प्रीती ? १४
अस्त्रकलापटु भीष्माची कीं प्रगल्भ शरविद्या
भारतीय नरवीर पार्थ तद्वेध्यकला वद्या ? १५
मेरूची ही सुवर्णता कीं हिमगिरि-शीतलता
दुग्धाब्धीची फेनराजि, ही काय तिची शुचिता ? १६
विंध्याचलवाहिनी तिची कीं प्रताप-मोहकता
हिरव्या हिरव्या नवांकुराची कीं ही कोमलता ! १७
समरधुरंधर जयवंताची ही विजयी ढाल
जयलक्ष्मीच्या द्वारावरची कीं तोरणमाळ ? १८

राष्ट्रविभूषण रणसिंहाच्या खड्गाची धारा
छत्रपतींची वत्सलता कीं ही दिनोद्धारा ? १९
शकुंतलेची प्रणयपत्रिका तीवरीची 'श्री' ही
सखी-विनोदें शकुंतलेची कीं स्मितलहरी ही ? २०
कल्पतरूची सौरभमिश्रित कीं ही सुमवृष्टी
मनोल्हादिनी स्वर्गंगेची तटाक-वनसृष्टी ? २१
अलकावतिच्या भालावरची ही कुंकुमरेखा
पारिजातक त्रिदश-तरूची लवली कीं शाखा ? २२
श्रुतिस्मृतींची वाणी कीं वेदार्थाची सरणी
व्यासांच्या कवितारत्नांची उज्वल कीं खाणी ? २३
कवि कुलगुरुची गगनविहारी विशाल कल्पकता
देवसभेंतिल देवगुरूची अगाध पंडितता ? २४
दिव्य पताका अमरावतिच्या कीं द्वारावरची
रुसून आली धरेवरी इंद्राची काय शची ? २५
गजार्तहारी हाकेसरसा धांवत जों आला
उसळीसरसी वैजयंति कीं आली भूमितला ? २६
वैकुंठाहुन पातालाची सफर करायाला
नारद सजले, मधें गळाली वीणेची माला ? २७

* * *

तारुण्याच्या वसंतांतली कीं ही कोकीळा
संसाराच्या निदाघकालातिल ही वनमाला ? २८
प्रीतीच्या बरसातीमधली उदार घनमाला
शरदृतूतिल नव धवलांगी कीं ज्योत्स्ना-बाला ? २९
शुभ्र शुभ्रतर कुंदकळ्यांची बाग फुले काय ?
वायु--विकंपित चंदनलतिका--संघ हसे काय ? ३०
मदनाची अभिलाषा रतिची कीं प्रणयाकांक्षा
भस्मासुरमोहिनी--मूर्ति कीं विश्वसमालक्ष्या ? ३१
गोपीमानस रंजविणारी कृष्णाची मुरली
सरस्वतीची किंवा वीणा ही हातामधली ? ३२
श्रीलक्ष्मीचा नाथ जाहला गोपींचा नाथ
शोधित शोधित तीच पातली कीं भूलोकांत ? ३३
कामधेनु कीं वशिष्ठ ऋषिची फलप्रदा माता
मनोरथाच्या चिंतामणिची कीं ही पूरकता ? ३४
शिवशीर्षीची चंद्रकला कीं, मात्रा प्रणवाची
ध्रुवमंडलगत किरणमालिका कीं रवितेजाची ? ३५
कनकगिरीची कन्या अथवा सूर्याची दुहिता
आत्मसुखाची ब्रह्मसुखाची ही निर्मल सरिता ? ३६
निरिच्छतेतिल समाधानता ही ऋषिनाथाची
समाधानतेतील समाधी साधुश्रेष्ठाची ? ३७

देवसभेंतिल मध्यवर्तिनी भव्य वेदिका ही
मोक्षसुखाची सदानंदिनी कल्पकता कीं ही ? ३८

बलिराजाची कीं कर्णाची उदारता भव्य
सीतासावित्रीची अथवा पवित्रता दिव्य ! ३९

विजयि पताका फडफडणारी अर्जुन-वीराची
निष्कृत्रिम मैत्री ही किंवा कृष्णार्जुन यांची ४०

हरिश्चंद्र नृप काय तयाची सत्वशीलता ही ?
पुण्यश्लोक नलाची अथवा, पुण्योत्तमता ही ? ४१

युधिष्ठिराच्या सत्यप्रिय वाणीची मंगलता
मोहहारिणी प्रबोधिनी कीं ही भगवद्गीता ? ४२

रघुराजाच्या प्रथित ' विश्वजित् ' यज्ञाची ज्वाला
शिलोद्धारिणी रघुनाथाची चरणरजोलीला ! ४३

अदृष्टपूर्वा ही सुंदरता कुबेरकोशाची
दृष्टव्या सलिलांतर्वासिनि सृष्टी वरुणाची ? ४४

दैत्यमर्दिनी चंडीची ही प्रसन्न विश्रांती
योगिजनांच्या दीर्घ तपस्येमधील चिच्छांती ? ४५

भवभूतीची करुणरसाची वाणी रसभरिता
दंडि कवींची ललित पदावलि, भास-रसोत्कटता ? ४६

बाणकवीची मदोन्मादिनी रसवंती कविता
स्वर्गंगाजलविहारिणी कीं हंसी अवतरिता ? ४७

* * *

पवित्र मंगल तपोवनांतिल ही लतिका काय ?
सिद्ध तापसी,-त्यांची ही आश्रम--हरिणी काय ? ४८
शरयूतटरुह-विलासिनी कीं ही विहगश्रेणी
पतिव्रता द्रौपदी तिची कीं विमुक्त ही वेणी ? ४९
धनंजयाच्या गांडीवाची अभंग-रश्मी ही ?
पार्थसारथी कीं कृष्णाची प्रतोद--रश्मी ही ? ५०
जरासंध-हननांतिल युक्ती ही यदुनाथाची
गोवर्धनधारिणी शक्ति ही कीं गिरिधारीची ? ५१
कौरवनाथ-प्रबोधिनी कृष्णाची शिष्टाई
शिवसंमोहक विलासिनी शबरीची चतुराई ? ५२
गजेंद्रमोक्ष–प्रसंगिंची ही हरिची धावकता
प्रल्हादास्तव-नरहरिची कीं रूपकसत्वरता ? ५३
कृष्णाची कालियाशिरींची नर्तनगति काय ?
नागकन्यका तिच्या करांतिल पंचारति काय ? ५४
भीष्मवधोद्यत विभु प्रार्थिला पार्थें अनिवार
गळून पडली गहिंवरलेल्या विभुची तलवार ? ५५
प्रपंच परमार्थांची संगति मूर्तिमति काय ?

निरिच्छ कर्माचारी त्यांची कर्मरती काय ? ५६
अमरावति ही, मायावति ही, भोगावति काय ?
ब्रह्मांडाच्या अनंत गोलांतिल संगति काय ? ५७
कालविजय पुरुषांच्या अथवा सुकृतीची सीमा
स्थितप्रज्ञ वृत्तीची अथवा परिणति अभिरामा ? ५८
मयूर-केका,- अभंगवाणी की ही तुकयाची
प्रबोधिनी भावार्थदीपिका श्रीज्ञानेशाची ? ५९
हनुमंताच्या हृदयांतरिंची ही रामप्रीती
बुद्धदेव त्याची किंवा संसारनिरासक्ती ? ६०
सज्जनगडची धर्मश्री, श्रीवर्धनपुण्यश्री
पुण्यपुरीची विभवश्री, शिवनेरीराज्यश्री ? ६१
भोजसभेंतिल कर्णमनोहर नवीन ही कविता
कविकुलगुरुची भोजप्रश्नामधील पूरकता ? ६२
मृगाजिनाच्या कंचुकिची इच्छा वैदेहीची
कांचनमृग-वेधकता किंवा ही श्रीरामाची ? ६३
चंदकवीची पृथ्वीराजापुढची ललकारी
भूषणकविची शिव-संमोहक वाणी श्रुतिहारी ? ६४
हिमाचलाच्या हृदयामधली निर्मल निर्झरता
वसुंधरेच्या हृदयामधली अखंड वत्सलता ? ६५

# समाराधन

( शिखरिणी )

१

अलंकारासाठीं इतर करिती हौस युवती
तुवाही कां त्यांची अनुकृति करावी गुणवती !
हिरे मोतीं कोठें सुगुण तव कोठें कुलवती !
गुणाशीं रत्नांचे दगड तुलितां येत नसती.

२

कुणी रंभा लोकीं निज-शरिर गे! देवि नटवो
कुणी तोरा इंद्रायणि भगवती ! स्वीय मिरवो
नखाचीही त्याना तव न समता येइल सती !
बलाका हंसीची विषम तुलना कोण करिती ?

३

कशाला कोकीळे ! वद गळसरी गे ! तुज हवी ?
तुझ्या या कंठाचा अमृतरस कर्णास निववी
कशाला सांगूं मी, विदित न तुला काय सुमती ?
अलंकारीवाणीपरिस न अलंकार-महती

४

जिथोनी ते नाना रस उगम घेतात दयिते !
निधान प्रेमाचें, रुचिर तव ऐसें हृदय तें
तयाची का हाराविण विलय पावे रुचिरता
स्वभावें जें आहे सुभग, नलगे त्या सुभगता

५

व्रतें दानें यानीं तव कर समालंकृत असो
सुवर्णाचें त्याला वलय नसले गे ! तरि नसो
तुझ्या पावित्र्याची हृदयिं भरते दिव्य सरिता
न लाधे पुण्याईविण निज-सखी धर्मनिरता

६

पतीमागें गेली जनक-तनया उत्सुक-मनें
कशाचे दागीने, कुसुम-तनुला भूर्जवसन !
तिला ऐश्वर्याचें स्मरणहि कधीं येइ न मनीं
पती वाचोनीया सति न दुसरें भूषण गणी

७

दिली पातिव्रत्यें हरि-हर-विधात्यास शिशुता
तपस्वी अत्रीची तुजसि अनुसूयाहि विदिता
प्रतिष्ठा दागीन्यावरुनि तिजला काय मिळते ?
दिगंतीं सत्कीर्ती गुणकिरण-मला पसरिते

८

स्मशान--स्थानीं तो भ्रमण गिरिजाशंकर करी
भुजगाच्या शय्येवरि पहुडला श्रीपति हरी
रमा गौरी त्या त्या स्थितिंतहि सुवंद्या त्रिभुवना
जगन्मान्या होती नच सुकृतिवाचून ललना

९

तुझी इच्छापूर्ती मजसि करणें दुष्कर नसे
कुबेरालाही मी रमविन महाकाव्य-सुरसें
परंतू यांचेची सवय न कधीं मानिनि मला
महात्मे यांचेच्या परिस ह्मणती मृत्युहि भला

# विजयी मराठा.

मृदु हस्तानीं मृदु कलिकांचा हार पूर्ण करणारी नवांगी सुंदरा कुणालाशी पाहून हसली आणि आनंदानें पुष्पहार घेऊन सामोरी गेली! तो रणांगणावरून आलेला विजयी मराठा असेल काय?

[गझल]

कुणाला पाहुनी हांसे—नवांगी सुंदरा बाला
कटीला खड्ग, करिं भाला—मराठा विजयि कीं आला १
मनाला हर्ष झालेला—पदाच्या नूपुरीं गेला
जहाली देवि सामोरी—मराठा विजयि कीं आला २
कळ्या ज्या डोलल्या चित्तीं—करांनीं रचित कलिकाला
मुखीं त्या शोभल्या साऱ्या—मराठा विजयि कीं आला ३
प्रमोदीं स्त्री-स्वभावाच्या—न सोडी मुग्ध लज्जेला
बगीचा लाल फुललेला—मराठा विजयि कीं आला ४
जपोनी बाल कलिकांची—रची जी बालिका माला
करीं ती घे कुसुमचपा—मराठा विजयि कीं आला ५
कुणा ही भाग्यवंताला—कुळाच्या कीर्तिवंताला
विलासी अर्पिते माला—मराठा विजयि कीं आला ६

वसे जी चमक सुगुणांत--तियेला जीव भुललेला
मिळाली नजर नजरेला—मराठा विजयि कीं आला ७
चमेली गौर हस्तानीं--समर्पी गौर सुम-माला
कवीला भास सत्याचा--मराठा विजयि कीं आला ८
कसें तें दृश्य तेव्हांचें--दिसावें आज नेत्रांला
कशाचा भास विदुलांला--'मराठा विजयि कीं आला ९

---

# शेवटची भेट

औरंगजेबानें रूपनगरच्या राजकन्येला बलात्कारानें वरण्याचा निश्चय केला होता. तिनें उदेपूरचा राणा राजसिंह यास मनानें वरून आपणास या संकटातून सोडविण्याविषयीं भाटाबरोबर विनंतपित्र पाठविलें राजसिंहानें तात्काळ तिच्या पाणिग्रहणाकरिता रूपनगरास ससैन्य प्रयाण केलें. आणि दिल्लीहून अफाट फौज घेऊन निघालेल्या औरंगजेबाला मार्गांत अडवून धरण्याकरितां एका १८ वर्षांच्या चोंडावत सरदाराला पाठविलें. त्याचें नुकतेंच लग्न झालें होतें. युद्धास निघतांना तो आपल्या नवपरिणीत वधूची भेट घेत आहे.

( भूपतों खरें तें वैभव०— )

वाजले नगारे रणांगणावरि जाया—
रजपूत निघाले तोडुनिया गृह-माया १
चौकांत उतरला चोंडावत सरदार—
ज्याच्या शिरिं होता त्या युद्धाचा भार २
पाठीस ढाल, कमरेस तिखट तलवार
दैवाच्या निकषीं जिची लाविली धार ३
मेवाड-भूपती रूपनगरची बाला—
परिणील तोंवरी अडवावें शाहाला ४

हें जयमरणाच्या मार्गांतिल कर्तव्य—
निर्वाण-परीक्षा-कीं शूराचें दिव्य ५
रणमद-चंचल जों दृष्टि गवाक्षीं गेली—
परिणीत-वधूची मूर्ति तयाला दिसली ६
हाडाकुल तिचिया जन्में भूषित होतें—
लग्नाचें कंकण अजुनी सुटलें नव्हतें ७
हळदीचा किंचित् पिवळा पिवळा रंग—
त्या गौरांगीचें खुलवित होता अंग ८
बिंदीचे हीरक झगमगती भालांत—
जणु तारा-मंडित वदनविधूचा प्रांत ९
निजसौख्याच्या नच, तिच्या सुखाच्या शोकीं—
तो शूर आपुले ओले डोळे झांकी १०
अंतरांत विरला, वळला, सदनीं शिरला—
अभ्रांतिल रविसम सतीस निजपति दिसला ११
तो ह्मणे—"प्रिये! घनघोर युद्ध होणार—
चोंडावत-कुल परतोनी नच येणार १२
मी करीन कुसवा धन्य आज मातेचा—
तुज कठवेळ परि काळ कसा दु:खाचा १३
वीराची ललना गंभीर-वाणी बोले—

“ जगिं चिरंजीव तरि कोण आजवरि झाले? १४
जा समरिं, करा कुळ-नाम आपुलें सार्थ—
मजविषयीं चिंता करूं नका तिळमात्र १५
जरि धारातीर्थी पडली अपुली काया—
तरि चितेंत शिरुनी वर येइन भेटाया ” १६

* * *

अठरा वर्षांचा वीर चालला वेगें—
परि वळून पाही एक दोनदा मागें. १७

# पतीचा अंत्य रणसंग्राम

[ शा० वि० ]

१

जो मागें हटला कधीं न भगवा झेंडा, हटूं लागला
शत्रु त्वेषभरांत भूमिवरतीं ओढूं बळें लागला
ढाला दख्खनच्या कितीक फिरल्या हें पाहुनी लोचनीं
अंबारींतुन जीवितेश उतरे खांडा करीं घेउनी !

२

तेव्हां एकच वेळ दृष्टि वळली माझ्याकडे, तींतली-
भाषा अंतिम दुःखदा सकरुणा विज्ञात ती जाहली
दाटोनी नयनांत बाष्प, कर मी भाळावरी ठेविला
मातें दर्शन-लाभ तोच घडला त्या घोर युद्धांतला

३

चावोनी अधरोष्ठ वीर-वर जों सेनाग्रणी धावला
व्योमीं भीषण धूमकेतु, समरीं तैसा दिसूं लागला
मर्दांनी पगड्या जरी परतल्या भूमींत त्या लोळल्या
दुर्दैवी कबिल्यांतल्या धसधसां बाला रडूं लागल्या

४

तो आवेश, तदीय ती चपलता, ती धीरता, शूरता
पाहोनी शिरली विपक्ष-हृदयीं प्रणार्थिनी भीरुता
शैलाचें शिखर प्रचंड तुटता लाटा जशा सागरीं
वीरोड्डाण-भरात दूर सरल्या सेना तशा सगरीं

५

सौभाग्येश्वर जेथ, तेथ रिपुचा संघात धावे अहा !
जेथें जीवित-नाथ तेथ कितिदा कल्लोल होई महा
'हत्तींच्या कळपात सिंह' उपमा म्यां ऐकिली वाचिली
शत्रूंच्या समुहात नाथ दिसता प्रत्यक्ष ती पाहिली

६

प्रेताचे पडले समूह, हटले लक्षावधी सैनिक
स्वामींच्या जवळीं रणात उरले शे दोनशे नायिक
पाण्यावाचुन शोष कंठिं पडला आरक्त झाली तनू
स्वारींचा ढळला न निश्चय परी आत्मार्पणाचा अणू

७

धारापात असह्य जैं प्रभुवरी होऊं अहा ! लागला
उत्साहें वरतीं जणो उसळला श्रीविष्णु यज्ञातला
वाणीला करितें विशद्ध, तनुला रोमांच जें आणितें
अद्यापि नयनास दृश्य दिसतें, प्रत्यक्षसें भासतें

८

स्वामी-रक्षक जाहले, नित कृपाछत्रात जे वाढले
त्यांनीं प्राण दिले, जयांस सदनीं प्राणाहुनी रक्षिलें
नाथांच्या तर रोमरांध्रिं इतुका आवेश संचारला
' होवो होईल तें, परंतु विमुखी होणेंच नाहीं मला '

९

जेथील श्रमवारि-बिंदु पुसिले म्यां आपुल्या अंचलें
त्या भाळातुन वाहिलें भळभळा रक्तौघ म्यां पाहिलें
शोभावा गिरिराज निर्झर जसा संवाहुनी मस्तकीं
तैसे शोभति नाथ, सूर्यकिरणीं अम्भोद आरक्त कीं

१०

होतें प्राण मुठींत मी धरुनिया पाहात हौद्यांतुनी
तन्मर्मीं बसतां प्रहार रडलें तैं क्रंदुनी क्रंदुनी
पाहाया वर मान जों उचलली तों जीविताचा धनी
नाहीं आढळला विकंपित अहा ! या माझिया लोचनीं

# वीर माता

अकबरानें चितोडास वेढा घातला, तेव्हा त्याशीं लढता लढतां चितोडच्या सूर्य दरवाजावरील साहिदास चोंडा पडल्यावर तो दरवाजा केळव्याचा पत्ता याजकडे येऊन तो त्याच्या संरक्षणार्थ लढत होता. या पत्त्याच्या वयास १६ वर्षेंही भरलीं नव्हतीं. त्याचा बाप नुकताच पडल्यामुळे त्यानें निराश होऊं नये म्हणून त्याची आई मागच्या भव्य तटावरून त्याला उत्तेजन देऊन म्हणाली, 'बाळा! चिंता नाहीं. चितोडच्या बचावाकरिता आपला निर्वंश झाला तरी चिंता नाहीं.'

( शा० वि० )

१

झाला ठार पिता रणांत लढतां द्वारांत दुर्गाचिया
पुत्राला कळलें अपेश जडतें कीं मत्कुलीं आज या
सोळावेंहि न वर्ष ज्यास भरलें, तो धावला साहसी
माता भव्य तटावरून बघते तें धन्य वाटे तिशीं

२

तेथें विक्रमवत सगरकलावेत्ते प्रतापी किती
त्यांचीही हट-सगरात पडलीं प्रेतें न त्याची मिती
धैर्याचे गिरि शत्रु सर्व गमले, हा बाल तच्छृंग-सा
ते मेघासम शोभले, विलसला हा तच्छिरीं अंशु-सा

३

ताताचें दिसलें अकस्मिक पुढें जैं प्रेत वीरोद्भवा
शत्रूच्या चरणीं रणीं तुडविलें तें जात होतें अहा !
शौर्याचा तट ढासळून फुटला कारुण्य-सिंधू तदा
दुःखीं एकुलतीच एक रडली प्रीती मनःकंपदा

४

तों येई ध्वनि—'कीर्ति रक्ष अपुली निर्वंश झाला तरी'
तो मातेस वळून वंदन करी धांवे पुन्हा समरीं
खड्गाग्रीं मिरवी स्वकीर्ति, मिळवी वीराग्रणी धन्यता
गाती तद्यश त्या चितोडगडिंच्या अबाध भू-देवता

# वीरमातेचा बंदिवान पुत्रास उपदेश

(दिंडी.)

१

नको बाळा ! परतून नको पाहूं
बंदिशालेची भीति नको वाहू
टाक धैर्यानें पाय पुढें शूरा !
देशभक्ताना भूषविते कारा

२

भूष्य होई जो भोसले कुलाला
तिलकवंशीं जो तिलक-रूप झाला
इथें त्यानींही धैर्य धरुन पोटीं
क्लेश साहियले जन्मभूमिसाठीं

३

देशबंधूंच्या राज्य-मनोवांच्छा
देश-भगिनींच्या पुण्ययशःकांक्षा
तुझ्या हृदयावरि नाचतात त्यातें
कसें बंधन करवेल कुणा हातें.

४

ढाळ अश्रू, परि जन्मभूमिसाठीं.
शोक कर तूं, परि देशबंधुसाठीं.
जननि भगिनी वा पुत्र सुता दारा
अशी भाग्याचे तुजमुळें कुमारा !

५

आर्यपुत्रावरि शैलशिखर-पात
घडो घडला शिरिं वज्र-महावात
अचल ठेविल तो धीर आत्मकाया
जन्मभूमीची बंधमुक्ति व्हाया

६

तुझा एकहि निश्वास जरि सुटेल
दाह भारत-हृदयास तो गमेल
आज दुःखाची मान पीळणारे
हवे खड्गावर वीर नाचणारे

७

भीति देवाची एक असूं द्यावी
राष्ट्रकार्याला मान पुढें द्यावी
राजदंडाच्या भीषण प्रसंगीं
शिवो दुर्बलता ती न अंतरंगीं

८

विषम विपदा कर्तव्य-सदाचारीं
असू द्यावे परि हृदय धैर्यधारी
वेळ आली तरि सिद्ध हो मराया
नको सेवूं परि दास्य-नरक वाया

९

सिंह दुर्दैवें विजित जे झाले
कधीं जेत्यानीं मुक्त तयां केलें
निजोद्धाराच्या मार्गीं सुमन-माळा
कधीं जेत्यांनीं अर्थरिल्या बाळा ?

१०

तिरस्कारार्ह न नीतिभंग होई
दुराचारावर पद न तुझा वाही
राष्ट्रसेवेला दोष मानण्याची
नीति चाले ही स्वार्थपर–जनांची

११

देशभक्ताचा घोर बंदिवास
सज्जनांचा छळ चालला उदास
अशावेळीं परमेश होय जागा
अनीतीच्या फुलल्या न कुठें बागा

१२

पुढें क्लेशाचे अभिनव प्रवेश
मनश्चितेचे विविध दुर्विलास
देहतापाची असह्यनीय बाधा
संकटाशीं दे झुंज खरा योद्धा

१३

ओघ सुटला स्वातंत्र्य-जान्हवीचा
घेइ आधार प्रथम शिव-तनूचा
किती तेव्हां पाषाण मधे आले
तयां बुडवोनी ओघ पुढें चाले

१४

मतिश्रेष्ठा ! अंधार कोठडींत
विश्व असुनी तिमिरात लुप्त जेथ
देशभक्ताचे कीर्ति-किरण तूंतें
शांति देतिल इतिहास-मार्मिकातें

१५

लढत असता स्वातंत्र्य-संगरांत
शूर शिरले जे अमर-मंदिरांत
पाठ देतिल, होतील भास त्यांचे
करी चिंतन तद्बोध-रहस्याचें

## १६

तुझें होइल जें स्मरण मज कुमारा !
तुझी आतांची मूर्ति ही गंभीरा
तिला स्मरुनी वाटेल मला धन्य
वीर-जननीचें भाग्य असामान्य

# वीर-विधवा.

शेवटच्या रावबाजींनीं पटवर्धनांच्या जहागिरी जप्त करण्याचा विचार मनांत आणिला हे जाणून परशुराम भाऊ पटवर्धनांनीं श्रीमंतास आपल्या घरीं मेजवानीस बोलाविलें. भोजनोत्तर श्रीमंत परत जावयास निघाले तों दाराजवळील पडवींत १८ विधवा खालीं माना घालून टिपें गाळीत बेवीत होत्या! श्रीमंतांनीं भाऊंस विचारिलें "हें काय?" भाऊंनीं उत्तर दिलें. पेशव्यांच्या गादीकरितां इतक्यांच्या नवऱ्यांनीं समरांगणावर प्राण दिले आहेत! पटवर्धनांच्या जहागिरीवर इतक्या विधवांचीं पोटें अवलंबून आहेत! अश्रूंनीं ओले झालेले या विधवांच्या तोंडातील घास काढण्याची कोणाला दुर्बुद्धि होईल?" रावबाजींनीं तो विचारच सोडिला.

(शा. वि)

१

जो बाणासम संगरांत शिरला 'घे घे' मुखें बोलुनी
ज्यानें हैदरच्या मुखीं बदलिली भाषा तहाची रणीं!
तो 'गोपाल' मदीय बंधु अपुल्या कीर्तीस विस्तारुनी
गेला स्वर्गींहि वीर; वीर-विधवा ही जेवते अश्रुंनीं

२

"ऱ्हा तोफांपुढतीं विखंडित जरी काया रणीं जाहली
बाहा स्वामियशार्थ आज तनुची रक्ताजली आपुली"

आज्ञेनें मम "नीलकंठ" सरला तों ठार झाला रणीं!
ही त्याच्या स्मरणांत वीर-विधवा आयुष्य कंठीं जनीं

३

जातें शत्रुकरीं निशाण बघिलें 'हा! हा!' ध्वनी जाहला
सक्रोधें रणिं "पांडुरंग" रिपुला कापीत तैं चालला!
आला घेउन तें निशाण, निकरीं पाठींत भाला घुसे!
गेला शूर नरेंद्र, वीर-विधवा दुःखाश्रु ती ही पुसे

४

'कोठें हैदर दाखवा?' खवळला, शोधीत जों चालला
'कान्होजी' रणिं कसहारि सकला कान्हाच तैं भासला!
अश्वीं अश्व भिडे, कडाबिन उडे, योद्धा चढे स्वर्गृहीं!
घेते घास करांत वीर-विधवा निःश्वास सोडीत ही

५

'बंधूचा उगवीन सूड' ह्मणुनी घोडा पुढें घातला
हा तो श्रीपति भीष्म-हारक असा तैं 'श्रीपती' भासला!
खड्गाचे फिरवीत हात उसळे, शीर्षीं गदा आदळे!
गेला वीर परंतु वीर-विधवा ही तद्वियोगें जळे

६

युद्धक्षेत्रिं महारथी पहुडले बंधू तिघे पाहुनी
'आतां मारिन कीं मरेन' वदला तो वासुदेव क्षणीं!

देहाचीहि न शुद्धि त्यास उरली संबद्ध झाला तरी !
ओले गाल पुसीत वीर-विधवा ही घास घेते करीं

७

खर्ड्याच्या समरांगणीं मजवरी कल्पांत जैं जाहला
माझा 'विठ्ठल' फोडुनी फळि तदा भ्रात्रीय तो धावला !
प्रेतें पाडुन शौर्यशालि पडला नाहीं पुन्हां बोलला !
त्याची ही विमनस्क वीर-विधवा माझी स्नुषा कोमला

८

जे योद्धे पटवर्धन प्रभुयश.सरक्षणीं कष्टले
ते सत्कीर्तिपथावरून अमर-क्रीडांगणीं पोंचले
त्यांच्या या हतभागि वीर-विधवा ज्या अश्रुंशीं जेवती
त्यांचे घासहि काढण्यास कवणा दुर्बुद्धि होईल ती ?

# विनती

[ शा० वि० ]

१

होती भागिरथी तटावरि कुणी बाष्पाकुला कामिनी
होता हस्त शिरास, दृष्टि जडली आकाश-नीलांगणीं
तेजानें अपुल्या असेल नटली देवी जगत्स्वामिनी
होतें साडत तेंच तेज तिचिया दोन्हीहि नेत्रांतुनी

२

चित्रें कांहिं इतस्तता पसरलीं होतीं तियेच्यापुढें
अश्रूंचा नव बिंदु बिंदु गळुनी त्यांच्यावरी तो पडे
राजा छत्रपती, चव्हाण नृपती, मेवाड राजेश्वर
त्याचेंही स्मृति-दुःख जाळित तिचें होतें तदा अंतर

३

मातें आठवली मदीय जननी, आलें मला तें रडे
तत्पादीं प्रणती करून विनती केली तियेच्या पुढें
'माते! तूं वद कोण येथ बसशी बाष्पाकुलालोचनीं?'
'बाळा! भारत-भू तुझीच!' थिजलों वाणी तिची ऐकुनी

४

झालों जागृत, चित्त विव्हल जणो अग्नीमधें पोळतें
अंतश्चक्षुपुढेंच चित्र दिसतें ना लेशही हाळतें
एकांतीं बसुनी विनंति करितों मी रुद्धकंठातरीं
देवा! भारतभूस तूं तरि अतां येऊन बा ! उद्धरी '

# दर्शनानंद

[गझल]

कशाची झोंप गे! बाई— बसोनी काढिली रात्र
शशीच्या शांत तेजांत— जहाले तप्त मे गात्र १
उषा जों हासली गालीं— खगाली जागृता झाली
विहारोद्यान — वायूची— सुगंधी वीचिही आली २
जनांची चुकवुनी दृष्टी— निघाल्यें स्वविणाला मी
उभी मी येथ ज्यासाठीं— मुकें तो जाय गो-स्वामी ३
कन्हय्या बोलला नाहीं— बिहारी हांसला नाहीं
वळोनी एकदाही गे!— खुणेला पाहिलें नाहीं ४
लकेरी वेणुची फेकी— विलासी कुंजवनचारी
मनाला ओढ लावोनी— निघोनी जाय गिरिधारी ५
कुरंगी हांसवुन गेला— मयूरी नाचवुन गेला
मला कां मात्र घननीळ— कळेना विन्मुखी झाला ६
सखे! जा गोपुरी सांग— अभागी राधिका मेली
इथें मी देह ठेवीन— जपोनी नाम 'वनमाली' ७

* * *

उदासी विरहिणी राधा— बघे जों मल्लिका-कुंज
तिथें श्रीकृष्ण गोविंद— तिला दे दर्शनानंद ८

# " भक्तीचे अश्रू "

[ गझल ]


खुणेची तीच ही जागा—खुणेची तीच ही वेळा
तयानें दाविली काल—स्वता तो ना इथें आला ! १
विमोही बोलुनी वाणी—करानें कुंतलें सारी
कळाली प्रीतिला नाहीं—ठकाची मोहिनी सारी ! २
गळ्याला हात लावोनी—विशकी जो करी मातें
सुखाचा काळ तो गेला—अता हा ताप चित्तातें ! ३
रची मी भक्तिची माला—भरोनी प्रीतिचा गंध
तयाच्या घालिते कंठीं—मला तो दे निरानंद ! ४
लतांच्या रम्य कुंजात—तरूंच्या रम्य गुंफात
तयाला शोध शोधोनी—विराला जीव जीवांत ! ५
फुलांचे ताटवे नाना—तिथेंही शोधिलें त्याला
मदाशा नीर ही घाली—स्मृतीच्या पुष्पवेलीला ! ६
कळ्या ज्या डोलल्या काल—सुकोनी आज त्या गेल्या
मदीया खिन्नवृत्तीच्या—वियोगीं मैत्रिणी झाल्या ! ७
हंसे जी स्वामिणी काल—रडे ती वाटते आज
तटाकीं अश्रु अश्रूंत—मिळाले मोहिनीराज ! ८

नको येऊं नको भेटूं—यशोदाचित्त—राजीवा
तटाकीं भक्ति-सिंधूच्या—सुखानें अर्पितें जीवा ! ९

× × ×

बुडाले राधिका-नेत्र—हरीच्या जों वियोगांत
अहा ! तों प्रगटला शाम-पुसाया राधिका-नेत्र ! १०

---



# " मुग्धा. "

[ दिंडी ]

१

दिसे सदनीं निजकार्य-रत नवोढा
परी मुग्धेचा पतिकडेच ओढा
चुकवि हरिणाक्षी दृष्टि गुरुजनांची
प्रीति दावी दृक्सगमीं मनाची

२

उदित होती नवभाव अंतरांत
दिसे उत्कंठा तरल लोचनात
मुखीं लज्जेनें शब्द फुटत नाहीं
प्रणय--मुग्धा ती अधिक अधिक मोही

३

स्नानसमयीं उडविलें सलिल नाथें
कुणी बघिलें का ? वळुनि ती पहाते
पुशी लटिक्या रागांत नीर--बिंदू
हृदयिं भरला तो प्रीतिसुधासिंधू

४

कुणी नव्हतें सदनांत संनिधानीं
तिला याची तो मधुर सलिल--दानीं


मुग्ध चपला जलकलश आणुनीया
पुढें ठेवी जाईहि हसोनीया

५

भवनमार्गीं तिज एकटी बघोनी
वळें संमुख तो जाहला पुढूनी
झणीं चमकोनी हासुनी नतांगी
जाय वाकोनी पदर सावरोनी

६

तिची ऐकाया मधुर कंठवाणी
पुन्हा अवरोधी मार्ग तो पुढूनी
"गडे जाऊं द्या!" शद्ब ऐकतांच
तोहि सरला, ध्वनि श्रवणसुखद साच



# सुप्त-सखी.

( शा० वि० )

१

झाला जागृत पत्नि-वल्लभ तदा होती पुरी शांतता
आकाशीं रमणीयता पसरली चोहींकडे सर्वथा
होती सुप्त सखी विकार रहिता तत्सन्निधानीं सुखें
आले तैं प्रणयी विचार हृदयीं मोहून गेल्यामुळें

× × ×

२

"आर्ये! सद्गुण शोभती विनयता संप्राप्त होता क्षणीं
सौंदर्य-द्युति त्यावरी विलसता स्वर्गीयता ये झणी
हे येथें त्रयवर्ग एकवटले त्वन्मूर्तिमाजी अहा !
आली काय सुरेंद्र--शापवचनें तूं भूवरी अप्सरा

३

ह्या त्वद्गौर विशाल भाल-पटलीं घर्मावली ये नवी
श्वासोच्छ्वासहि दीर्घ चालत असे, निस्तेज तुंड-च्छवी
ऐसें काय बरें परिश्रम तुला झाले मनोहारिणी
कैसा शब्द न एकही उमटतो त्वद्रुद्धकंठातुनी

४

कीं चित्तीं अपराध पूर्वनिशिचा जाणोनिया सुंदरी
होशी अंतरिं दुःखिता, परि वसे ही शांतता त्वन्मुखीं
नेत्रोन्मीलन एकदा करुनिया पाही मनोमोहिनी
दृष्टीच्या तव दिव्य नीलकिरणीं टाकीं मला मारुनी

५

देवी ! त्वन्मुखिं मंद मंद विलसे हें हास्य मंदस्मिते !
मच्छृंगारिक कीं तुला पडतसे सु-स्वप्न सुप्तस्थिते !
व्हाया मुक्त सलज्ज तूं विनविशी गे ! बाहुपाशातुनी
आहे स्वप्न परी तुला गमतसे तें सत्य विभ्रंशिनी

६

आले अलकाग्र पुष्पतरु-से होवोनिया खालती
तैसा माधवि-पुष्पहार विखरे हा त्वत्तनूभोंवती
त्यामध्यें मुख हें तुझें बघुनिया वाटे मला कीं असें,
आकाशस्थ विधूच नंदनवनीं विश्रांति हा घेतसे !

७

हें येथें बघ तंतु-वाद्य सुगुणे ! आहे तुझें ठेविलें
ज्याच्या रम्य सुरात तूं कितिकदां मच्चित्त-संतोषिलें
तें घे ऊठ करांत, पंचमस्वरें तूं कोकिला जागवी
प्रेमें साथ करील गे मग तुझी ती गायिका माधवी

५४०

८

गानारंभि निजांकिं ठेवुन विणा बिंबाधरे! गाशिल
जाणोनी मुखसाम्य हा शुकहि गे मजुध्वनी काढिल
भ्रूभंगान्वित नेत्र पाहुन तुझे ही गानलुब्धा मृगी
सोडोनी तृण येउनी तुजपुढें राहील मोदें उभी

९

साध्वी! हा तव उत्तरीय पट ये पीनस्तनाधःस्थलीं
श्वासोच्छ्वासहि दीर्घ चालुन सुटे त्वत्कंचुकी-ग्रंथि ही
पर्यंकीं वळतां, कुचद्वय तुझें सलग्न होती अहा!
पाहोनी मजला गमे समसमा कीं रम्य संयोग हा

१०

हा तारापति मोहुनी तुजकडे पाही गवाक्षातुनी
जेणें कांतवियोगिनी झुरविल्या कित्येक संत्रासुनी
झाल्या ज्या सुपतिव्रता जगतिं या, तूं त्यातली एक गे!
जाराच्या कृति ह्या न ठाऊक तुला रम्य प्रसन्नानने!"

११

तों स्वाभाविक हो प्रबोधित तदा ती चारुगात्री सखी
वेगें सांवरुनी उरोज-वसना खालीं उभी राहिली
"निद्राभंग मधेंच काय अपुला माझ्यामुळें जाहला
झालें का विमनस्क चित्त अपुलें? व्हावी मला हो क्षमा!"

१२

"देवी! काय विशुद्ध हें मन तुझें नाहींच म्यां जाणिलें
नाहीं प्रेम तुझें तसें अजवरि तोडून म्या पाहिलें
सौंदर्यातिशयें क्षणैक इतरा पाहून वाटे मला
'सोने सर्वचि हेम, जें चमकतें!' छे, हे न लागे तुला

१३

प्रेमाच्या लहरी विशुद्ध उठल्या ज्या ह्या मदीयांतरीं
कांते! मिश्रित जाहल्या तव गडे! दिव्यात्मतेजोरसीं
तेणें त्वन्मुख-पंकजीं रुचिरता जी ये मनोमोहिनी
वर्णाया कवि कालिदासच हवा वाग्देविचा सन्मणी"

१४

लज्जानम्र-मुखी मदालस-तनू ती सस्मिता बोलली
"नाहीं प्रीतिस पात्र, ही प्रणयता दासीवरी आपुली!"
तेणें प्रीतिभरें तिला निजकरीं स्वांकावरी स्थापिता
तेव्हां जी नयन-द्युती चमकली वर्णील ती कोणता?

# मानिनी.

(दिंडी)

१

पहाटेचा बघ शुक्र वरीं आला
शांत निजला रजनीश पश्चिमेला
उषा-वदनीं स्मित मधुर विलसुं लागे
सोड आता तरि मान मानिनी गे !

२

मुग्ध कुमुदिनि हांसून सुप्त झाल्या
चकोरीही नाचून सुखें गेल्या
तुवा अजुनीही विन्मुखी असावें
रसिकहृदये ! हें उचित तुज नसावें

३

असामान्यांचा मान सहरोनी
किती केले अभिनमित पुरुष मानी
दास झालों मी तोच मानिनीचा !
दोष मोहिनि तव रूप-मोहिनीचा !

४

सोड, हास्याच्या मधुर चंद्रिकेला
शात होइन, जरि चंद्र हा बुडाला

चंद्रिके ! हा तव कंठ-चंद्रहार
दिसे हास्याविण मलिन आज फार

५

सुरतलीलाप्रिय चषक मधु-रसाचे
उभयतांनीं आरंभिं घ्यावयाचे
अधरमाधुरिशीं माधुरी तयांची
दिली संधि न अनुभवुन पाहण्याची

६

पुष्प वेणीचें एक ना गळालें
कुचोप्रांतीं तेजस्वि हार खेळे
पूर्वनिशिंचा सुटला न नीविबंध
मैत्रिणींचा दोषील तुला वृंद

७

विकच कलिकांचा गंधवायु वाहे
कोकिलाही मधु शद्ब करित आहे
तुझ्या हृदयाला कंप येत नाहीं
गौर कंठाचा शद्ब फुटत नाहीं

८

बकुलमालाही साहवे न ज्यांत
विकल होई जें मृदुल कमलगात्रें

कसें कमले ! तें कठिण हृदय केलें ?
भ्रूकुटि-चापाची वक्रता न हाले

९

शिरोभूषणिं कीं कंठभूषणीं तूं
सांग धरिला कां वचनबद्ध हेतू ?
तरी प्रीतीच्या दिव्य भूषणाला
त्यजुनि वाछिशि का देवि ! नश्वराला ?



# भामिनी.

( दिंडी )

१

तुझ्या प्रीतीच्या रुचिर हिरवळीला
व्यर्थ सजलों मी पायिं तुडविण्याला
असा स्मरतो का समय भामिनी गे?
तुझ्या वदनें मद्दोष आयकू दे.

२

तुझ्या इच्छेच्या ललित पुष्प-वेली
कधीं खुडिल्या वा ओढियल्या खालीं
असा आठवतो साग कां प्रसंग?
मनोभंगें तव, ममहि मनोभंग

३

मन·कांक्षेच्या बकुल-मंजरीला
रसिक-बकुले! पददलित करायाला
कधीं सजलों मी? स्मरण होत नाहीं
तुझ्या स्मृति-दुःखीं स्थान मला देई

४

मंगलाशेचे हार गुंफियेलें
एक तरि का तत्पुष्प विखरियेलें ?
तुझ्या स्मृतिफलकीं एक तरी ओळ
सत्यवादिनि असलीहि तरी बोल.

५

कुमुद-धवलागे ! धवल भावनेच्या
मनोहारिणि अभिरम्य मनोवांच्छा
विरस केल्या कधिं बोल एकदां गे !
खिन्नतेच्या पथिं जीव फार भागे

६

स्वर्गसौख्याचे दिवस जीविताचे
तुझ्या सहवासीं सकळ जावयाचे
आज त्यातिल दिन एक हा गळाला
सांग तुझिया कां मानला मनाला ?



# वंचना.

(दिंडी)

१

काल प्रीतीचा बाग लाविलास
मधुप होतों मी करित हा विलास !
आज लावियला अग्नि तया हातें
दुःख होतें, परि बोलतां न येतें

२

काल दरवळला केतकी-सुवास
दंग केलें मोहूनि या जिवास
आज सुटती हे तीव्रविषोच्छ्वास
मधुस्थानीं हा विषमगुणनिवास

३

काल हंसली संतोष चंद्रिका ती
हर्ष झाला उद्भूतभावनातीं
आज पसरे नैराश्य-रजनि हाय !
नेत्र झाकावे अन्य नच उपाय

४

काल इंद्राला तुच्छ गणित होतों
पौर्णिमेच्या चंद्रास हसत होतों
आज सामान्यहि हंसति मला लोक !
प्रीतिभंगाचा तीव्र ताप-शोक

५

काल गगनीं, अवनींहि सौख्य नांदे
परत गेलीं सव्रीड अमरवृंदें
आज हस्तावरि हस्त ठेवुनीया
स्वस्थ बसली निस्तेज तनु मदीया !

६

काल प्रीती-पुनरुक्तदोष झाला
तरी दोघांना तो न कळुन आला
आज उपमा त्या पिष्टपेषणाची
तुवा द्यावी ना निरस भावनेची ?

७

काल रोमांचित देह होत होता
स्थिति स्पृहणीया खचित अननुभूता

नव्हति मातें तैं कल्पना उद्याची
तुझ्या हृदयाची यास साक्ष साची !

८

घाव शस्त्राविण हृदयिं मारिलास
दाह अग्नीविण तनुस लाविलास
जळावाचुनि त्वां बुडविलेंस डोहीं
देहधारी हा जाहला विदेही !

९

सुरी नव्हती का तीक्ष्ण राव करांत?
विष न लाधे का शोधुनी जगांत ?
सहज केला असतास मदीयांत
तुझ्या अंकावरि झोपतों नितांत !

१०

नको आठवु मज, मीच आठवीन
नको बोलूं, मी नांव तव जपेन
प्रीति-पाठावरि धूळ तूं फिरीव
लेख हृदयीं मम उमटला सजीव !

# वंचनेनंतर

## याचना संभवत नाहीं.

( दिंडी )

१

जेथ पुष्करिणी सलिलरम्य हांसे
तेथ मरुभूमी रुक्ष आज भासे
अशा वचनिं करुनीहि याचनेला
काय शांती लाधेल व्याकुलाला ?

२

मधुर हास्याच्या मधुर रहस्याच्या
रुचिर मोदाच्या रुचिर विनोदाच्या
दग्ध झाल्या सद्भावना मनाच्या
अतां याचनिं का सफल व्हावयाच्या ?

३

प्रीति-लतिका वाळून हाय ! गेली
तिला सलिलानें जरिहि सिंचियेली
काय पुष्पांचा तिजसि ये बहार ?
विफल यत्नाचें दुःख मात्र फार

४

रुष्टतेला सत्प्रीति शांतवील
हृदय-बंधन दृढ अधिक ती करील
वंचनेची परि याचना कराया
मुखीं काढी ना शब्द एक वायां !

५

वसे वंचनिं जो सूक्ष्म अहंकार
व्यर्थ याचनिं तो अधिक वाढणार
अहंकारातुनि जन्म जिचा झाला
अशी प्रीती का रिझविते मनाला ?

६

रसिक-हृदयाची विषमता वधूं दे
सरस मंजिरिला विरस तो स्रवूं दे
महाश्रयीं जें अल्प सौख्य राहे
तदनुभव ह्या हृदयास येत आहे.



# विरहिणी.

( वियोगिनी-वृत्त )

१

सखये ! नच लावि हा गडे !
तनुतें चंदन-पंक दाहवी
रमणीय उपोवनीं तरी
चल जाऊं रमवू मना सये !

२

मधुरा मधु-यामिनी युवा
सुखदा होति मनोविहारिणी
मज मात्र किती विदुःख-दा
गमती गा रमणा ! तुझ्याविना

३

मजसी कुरवाळुनी प्रिया !
शयनीं जें वदसी न तें खरें !
तरि मत्सखिचे सखे किती
गृहिं येती तरि का न येशि तूं ?

४

बहुदूरगतप्रिया ! मनीं
न सहे त्वद्विरहा वियोगिनी
रविनें सर शोषितां जशी
शफरी व्याकुळ होई, मी तशी

५

नलिनी आलि, हंस हंसिणी
रमती काननिं या प्रियांसवें
सखिचें मन नाहिं रंजवी
तव काल-व्यय हा नसे बरा

६

ललिता सु-लता प्रफुल्लिता
जणुं पुष्पीं वनिता अलंकृता
डुलती रुचिरा नवांकुरा
प्रियवृक्षासह हर्षनिर्भरा

७

सहकार-ज मंजिऱ्या नव्या
अलि-गुंजारव होइ ज्यावरी

पिक सेवुनि त्या नवांकुरा
हरिती मन्मन पंचमस्वरीं

८

करिती शुक-सारिका सुखें
मधुरालाप उपोवनांत या
सुमना ! मन त्यात ना रमे
तव गान-स्मृति मात्र होइ गा !

९

सुम-गंध न हा मला गमे
हृदया तापद होई कां तरी ?
अति शीत तुषार हे अहा !
मज संततसाचि भासती परी

१०

वदली विधुतें प्रशांत या
मग कां तापवि हा मला बरें ?
' घडता विपरीत सत्क्रिया
सुखद क्लेशद होति हें खरें '

११

सखया ! मज सारखीच कां ?
तव वृत्ती विरही असेल गा !

मग कां न वरें सुखें गृहीं
मधुमासींहि न येशि तूं झणी

१२

पसरून सुमें सुकोमळ
शयना भूषवि मी स्वमंदिरीं
परि नागमन-प्रकार हा
हृदया पोळवितो क्षणोक्षणीं

१३

मम दैवत तूंच राजसा
नलगे हें वदणेंच म्यां गडे !
स्मरुनी झुरतें मनीं बहू
कधि भेटी घडतील ना कळे

१४

लवतो बहु सव्य नेत्र हा
कुशली-वृत्तहि ना कळे तुझें
सहते दिन मी मनीं कसे
तुज ह्याची कधि कल्पना असे !

# वियोगिनी.

" इतक्यात प्रवासास गेलेल्या आपल्या पतीच्या निधनाची वार्ता कोणीं तिला कळविली. जणूं विधीला तिच्या शोकाची परीक्षाच पहावयाची होती ! " नंतर–

[ वियोगिनी–वृत्त ]

१

पतिच्या निधनास ऐकतां
कदलीच्या सम ती पडे क्षितीं
असती जवळी जरी सख्या
तरि त्यां सांवरली न ती सती

२

करिती जलसिंचन-क्रिया
कटि-वस्त्रें पवनास वारिती
विवशा नच हो विबोधिता
बहु केले सदुपायही जरी

३

उठली, परि संभ्रमें पुसे
'प्रिय आले वद काय? कीं कुठें?
कळला भ्रम मात्र हा असे
तइं सीमा असुखास ना उरे

४

पडली धरणीवरी पुन्हां
कबरी विस्खलिता असे जिची
रडते कर ठेउनी उरीं
जलधारा गळती कुचांवरी

५

सखया मज सोडुनी इथें
बसशी स्वर्भुवनांत तूं कसा ?
बघतें पथ मी तुझा इथें
न कळे काय तरी करूं बरें ?

६

त्यजिली मम मैत्री तू खरी
ह्मणुनी हा बहु खेद होतसे
कपटी खल काल हा तरी
असु तूझे हरि ठेवि का मम ?

७

' मज दर्शन होइल ' प्रिया !
मनिं आशा बहु होति, ही परी

न उरे किमपीहि ती अतां
दिन कठू वद हे कुणावरी ?

८

जल-संचय शुष्क जाहला
वद मत्स्यी जगते कशी तिथें ?
तरु दग्ध, तदाश्रिता लता
विहरे हें श्रवणीं न ऐकिलें !

९

पडला विधि--घात हा शिरीं
गृह भासे मज कानना सम
करि अप्रिय ना तुझें प्रिया !
मग का ही धरिलीस मुग्धता

१०

क्षणिं कस्तुरि चंदनान्विता
हरिणाक्षी दिसली, तिचीच ही—
दिसते तनु धूलि–धूसरा
विषमा ही करणी विधे ! तुझी

११

स्मितहास्य करोनिया तुला
गमनीं प्रेमकटाक्ष फेंकिला


मुरडी नयनास तूं तसा
निजसंवादचि शेवटील तो

१२

गळतां कटिमेखला मम
झणि तूं सावरिली कितीकदां
रुदिता पडली सखी तुझी
उठवीशी तरि येउनी न कां ?

१३

किति शोक करील ती बरें । तिज आजन्मचि साहणें असे
कविचें मन मात्र कोमल । तिजसी आठवतो घडी घडी



# " आकांक्षिणी "

( दिंडी )

१

अंत जाई, बाहेर पुन्हा येई
उभी राही, चोरून मधुन पाही
मुग्ध आकांक्षिणि शब्द वदत नाहीं
मन'कांक्षा नयनीं न लपे कांहीं

२

शिथिल झाला कचबंध, सुम गळालें
उरोजाला सोडून पदर हाले
परी आकांक्षिणिला न शुद्धि राही
मनो विभ्रंशिनिला न सुचे कांहीं

३

हृदय हांसे हृदयांत मनहि हांसे
नेत्र-कनिनीका त्यामुळें विकासे
हास्य नेत्रांतुनि अवतरे कपोलीं
पूर आला, तों दृष्टि लवे खालीं !

४

नयनकिरणाचें नीळधनु उभारी
मनोवांछेची त्यास लावि दोरी
प्रणयभावांचे तीव्र बाण सोडी
कांक्षिताला व्याकूळ करुन सोडी

५

नवप्रीतीची रुचिर उत्कटेच्छा
नव प्रणयाची मुग्ध मधुर वांछा
निरतिशय तो अनुराग मुखीं खेळे
परी लज्जा भय फिरवितात डोळे

६

काम करिते कामात लक्ष नाहीं
वचन वदते वचनात लक्ष नाहीं
कामिनीच्या मनिं कामना उदेल्या
विकल त्यांनीं हरिणाक्षि-वृत्ति केल्या

# शेवाळ नदीच्या कांठीं

सामान्य वाटणाऱ्या उपमेंत देखील किती खोल अर्थ असतो तो अनुभवावांचून कळत नाहीं. या ध्वनिकाव्यांत शेवाळ या उपमेयाचा मूळ उपमानाशीं लिंग भेद झाला आहे.

(दिंडी)

१

जेथ रसिकांचें हृदय विलोभावें
आत्मविज्ञांचें चित्तही रमावें
अशा तटिनीच्या आननासभोंती
गमे तापद शैवाल--हीनकांती

२

सलिलरूपी यच्छ्दय शांति देई
लहरिरूपी भ्रूभ्रमण हेतु दावी
जरा रसिकेचा प्रकट भाव होतो
तोच शैवालोद्रेक ताप देतो

३

मनः सृष्टीला व्यक्त रूप देती
चित्तभूमीला नित्य शोधितातीं

दृष्टि त्यांची निष्पाप लुब्ध होय
सेव्य तीतें शैवाल, गमे काय !

४

चलत्कमलाच्या दिव्य भूषणांहीं
हीनरूपीं शैवाल खुलत नाहीं
स्वयंसौंदर्यें सुंदरी विराजे
जरठ तनुतें वैराग्य मात्र साजे

५

विरक्तांना अनुरक्त करायाची
शक्ति नैसर्गिक मात्र निर्झरीची
तिला झाकुन शैवाल पुढें येतें
मूढ हृदयाची साक्ष मात्र देतें

६

नागिणीचा दुःसंग केतकीला
कृष्णकादंबिनि-संग चंद्रिकेला
नदीलागीं शैवाल-संग तैसा
सृष्टि-दोषें कवि टाकतो उसासा

७

'क्षणिक विषयस्थिति नष्ट व्हावयाची'
मनोवाञ्छा ही वाढली बुधाची
नियत दुःस्थिति ढळली न इष्टकाळीं
संग--तत्वें जन्मास तदा आली!

८

रहा शैवाला! स्थान नको सोडूं
रसिक-मलिन--सत्पुण्य नको जोडूं
दिव्य लोकींही शाम--पट नभाचा
नाच चाळवि बुध-दिव्यकल्पनांचा!

९

कल्पनेच्या पवनांत चारुतेचीं
फुलें विज्ञानी उधळितात साचीं
रसिक सेवितिं त्यातील मरंदास
चित्रकांची ही उपकृती जगास

# तो क्षण

( दिंडी )

१

कुंदकलिकांची मृदुल शुभ्र शय्या
द्राक्षलतिकेची थंडगार छाया
शरज्ज्योत्स्नेंतिल मधुर पय पान
असा गमला तो क्षण विलासपूर्ण

२

त्यांत अनुकंपा मंद मंद हांसे
मनीषेची कळि हळुहळू विकासे
नवप्रीती प्रीतीस भेट देई
असा तो क्षण चित्तास ओढ लावी

३

बघत असता आकाश-यान जावें
नभःपटलीं कीं इंद्र-धनु विरावें
स्वप्न निद्रांतीं जाय कीं बुडोनी
तसा गेला तो क्षण अहा! निघोनी

४

तदा चढला कळसास हर्ष दाटे
स्वर्ग उरला जीवास चार बोटें
अतां तो क्षण येईल कधिं फिरून
जाय चिंतनिं या क्षण दिनासमान !

५

तदा उठले रोमांच किती देहीं
अहा ! आनंदोच्छ्वास किती तेवीं
किती भरला अनुराग—कंप तेव्हां
आज विरहाचा व्याधि जडे जीवा !

६

देह भूमीवरि, जीव वायुसंगें
नभीं वेड्यासम धावतो प्रवेगें
जणों सर्वस्वचि हरपलें जिवाचें
हृदयिं पसरे साम्राज्य शून्यतेचें !

७

सुखामागुन कां दुःख जगीं येई ?
प्रीतिमागुन कां विरह घाव घेई ?

मनोवांछा मधु हास्य करी जेथें,
तिथें आशा का विरह–गीत गातें?

८

विरल पसरे घन-पटल अंबरात
त्यात विचरे गततेज निशानाथ
तशी दिनचर्या चालली मदीया
उदासीची घेऊन मुखीं छाया!

९

शब्द माझे मज अर्थ सांगतात
परि प्रकटार्थ–द्वारिं थांबतात
जसा युवतीचा नवकुच-प्रदेश
तरल वस्त्राचा त्यावरी विलास!

१०

हवा तो क्षण पीयूष नको मातें
हवा तो क्षण आयुष्य नको मातें
ज्यात भरलें स्वर्गीय सौख्य–सार
तदिच्छेचा जप हृदय करी फार!

# पुष्प क्षेप

(दिंडी)

१

मृदुल हस्तीं मृदु पुष्पपुंज आला
रसिक हृदयाची साक्ष दे मनाला
उचंबळुनी हृदयस्थ भाव आले
सर्व देहीं रोमाच उभे ठेले !

२

करित असतां कुणि देवि पुष्पमाला
तिच्या करिंचा सुमनिकर कीं गळाला
समीरानें कीं कल्पलता हाले
तिच्या कुसुमांनीं धन्य मला केलें !

३

जणो लाटेवरि नांव ती चढावी
सूर्य-मंडळिं चंडोल–गती जावी
कविप्रतिभेचा स्रोत उठे जैसा
घडे आनंदानुभव अहा तैसा !

४

मूक हृदयाचा अर्थ वसे त्यांत
गंधरूपें करि मानस प्रशांत
खुले मधुरेच्या हास्य जें कपोलीं
काय तत्तेजें धवल फुलें झालीं ?

५

रम्य तत्त्वें विद्वान कवीशांचीं
बोधवाक्यें कीं वच सद्गुरूचीं
जशीं परमार्थ ज्ञान-रूपकें तीं
तशीं पुष्पें तीं सेवनीय होतीं !

६

गगनतारा, कीं किरण सुधांशूचे
वियद्गंगेचे अंबुबिंदु साचे
काय अमृताचा कुंभ उहुळला तो
पुष्परूपें तद्बिंदु--पात होतो ?

७

दोन हृदयें त्या बांधिलीं सुमांनीं
उषा--रवि जैसे बद्ध तारकांनीं

जरी दिसतिल निस्तेज तीं कुणास
हृदाकाशीं तत्तेज-संनिवास !

८

उपायन तरि देवीस काय द्यावें ?
कसें उतराई प्रीतिभरें व्हावें ?
फुलें हृदयाचीं फुलविलीं फुलांनीं
दिलीं कविता-परडींत पाठवोनी !

---



# अनुताप

( चंद्रकांत राजाची कन्या. )

दळें उमललीं दोन मनोहर प्रीती-कलिकेचीं
अधीरतेनें हानी घडली चिर सौंदर्याची ! १

मुग्ध मधुर तेजात हासली प्रीतीची ज्योत
चंचलतेची लहरी गेली करूनिया घात ! २

आली होती काठाजवळी प्रीतीची नांव
उतावीळ मन करून बसलें विफल मनोभाव ! ३

भीत भीत अस्पष्ट बोलली प्रीतीची मैना
प्रबलेच्छेनें निरिच्छ केलें उत्सुक वृत्तींना ! ४

भय सोडोनी स्थिर जों होई प्रीतीची हरिणी
धृष्टपणानें सहवासाची लावियली झुरणी ! ५

लटक्या रागें प्रीति घेतसे प्रीतीचा ठाव
दुष्ट अहंता मारुन गेली हृदयावरि घाव ! ६

लाजत लाजत जरा उघडिलें प्रीतीचें द्वार
अविवेकानें हताश आशा रडली अनिवार ! ७

सामोरी ये स्वर्गसुखाला जों प्रीती देवी

अंतरलें विमनस्कपणानें अलभ्य सुख भावी ! ८
कठमधुर अधरास लाविली प्रीतीची मुरली
उत्कटता माजली पिपासा अश्रूंना प्याली ! ९
स्मृतिकंटक जे विव्हल करिती विव्हल हृदयाला
त्याच कटकीं सुखें भावना सजल्या क्रीडेला ! १०

—×—



# विरस

[ चंद्रकांत राजाची कन्या ]

निशिगंधाची कळी करपली परिमळ मावळला
मूक जाहली मधुर सारिका प्रमोदही सरला ! १

पक्ष तुटोनी काव्यप्रतिभा खालीं धडपडली
कवितेच्या भाळावर रेषा चिंतेची उठली ! २

सरस्वतीच्या वीणेमधली रम्य तार तुटली
गानलुब्ध चित्ताची हुरहुर वाढतची गेली ! ३

कोंदणांतली हिरकणि ढळली शोभा मावळली
रसज्ञतेच्या गालावरती पांडुरता आली ! ४

स्वप्न हरपलें, रजनी उरली चिंतेची मात्र
हृदयाचा उच्छ्वास जाहला प्रेमळ सन्मित्र ! ५

प्रीतिदेविच्या बुचड्या मधला गुलाब कीं गळला
प्रेमाच्या दुग्धात मिठाचा कण किंवा पडला ! ६

सुंदर मेघाकृति बघताना विरून कीं गेली
नेत्रपिपासा शून्याकाशीं हताश वावरली ! ७

खेळत होती आश्रमहरिणी रुसून ती गेली
वनवासी जीवाला बाधा विरहाची झाली ! ८

प्राशियले जों मयूरिणीच्या नेत्राचे बिंदू
तोंच तिनें लाविला तराया वियोग दुःसिंधु ! ९

# विद्ध हरिणी

( शा० वि० )

१

विश्रांतिस्तव ज्या मनोहर लता--कुंजीं कुरंगांगना--
होती झोंपत; आज भग्नहृदया दुःखें त्यजी त्या वना !
भक्षोनी हरितांकुरास सलील प्राशीत होती जिथें
जातांना वननिर्झरास वळुनी मागें पुन्हा पाहते !

२

बाळें दोन तिचीं वनीं दुडुदुडू मागें तिच्या धांवती
ती पुत्रास्तव मंद मंद चरणीं व्याकूळ चाले सती !
नेत्रीं मोहक तें दिसो, प्रियजन स्थानीं सुखें त्या वसो
जेथें प्राणवियोग तेथ वसती एका क्षणाची नको

३

जी झाली शुभदर्शनीय कितिदां मार्गीं शुभेच्छू जनां
होती सुंदरि सृष्टिच्या करित जी सौंदर्य--संवर्धना
यन्नेत्रीं 'मृगलोचना' ह्मणविल्या सौभाग्यवंती स्त्रिया
जाते येथुन ती अभागिनि अहा ! दुर्भाग्य भोगोनिया !

४

वर्षा येइल, भूप्रदेश हिरवा होईल चोहींकडे
मोदें निर्झर धांवतील गिरिचे उल्लघुनीया कडे
स्वच्छंदें विहगावली तरुवरी गाईल काव्यें नवीं
होवो हें रमणीय कानन मृगी केव्हां न येईल ही !

५

ज्या व्याधें शर हाणिला, चुकविली तत्क्रूर दृष्टी कशी ?
आपत्तींतुन पाडसें तरि हिनें सरक्षिलीं हीं कशी !
दु:खें चोहिंकडून एकसमयीं दु:सह्य आल्यावर
आपत्तींत निराश्रितास असतो मातापिता ईश्वर

# काय-सांगू ?

१

" इच्छा अंतिम सुंदरी वद तरी ? "-- आर्तस्वरें बोलतां,
गेली तर्जनि दाउनी तुजकडे स्वर्गीय ती देवता !
छायाचित्र तिचेंच हें, स्वजननी चित्रांत घे पाहुनी
अश्रू वाहविले तरी प्रशमना येई न कल्याणिनी !

२

बाले ! होतिस तूं अजाण अगदीं दुग्धोपजीवीच गे !
मातें आठवता प्रसंग पिळुनी हें चित्त माझें निघे
निद्रा अल्प तुला, प्रगाढ तिजला, मी एकटा जागृत
अश्रूंचीं कुसुमें मुखावर तिच्या तैं बैसलों वाहत !

३

होशी जागृत तूं क्षुधाकुल, तुवां आरंभिलें रोदन
दोन्ही हात तिच्याकडे पसरिशी माझ्याकडे पाहुन !
एका अंकिं तुला, तिलाहि दुसऱ्या अंकावरी स्थापुनी
माझी ती मजलाच ठाउक, कशी मीं काढिली यामिनी !

४

कार्यव्यग्र मनस्थितींत घडते आबाळ बाळे ! यदा
इच्छादर्शिनि-तर्जनी दिसतसे स्वर्गामिनीची तदा !
कष्टें आवरितों तरीहि गळते मन्नेत्र-धारावळी
तू कंठास धरून हेतु पुससी, मी काय सांगू मुली ?

# स्मृति.

( चाल-गजल. )

पहातों मी मृगी रानीं पहातों तारका व्योमीं
परी ती मूर्ति कोठेंही शुभांगे ! गे ! बघेना मी ! १

नभाच्या भव्य भवनांत भरारी कल्पना घेते
तिला या शून्य आकाशीं विशून्या मूर्ति ना भेटे ! २

सुखाचे हेतु जे होते तुझ्या ते मागुते गेले
स्मृतींचीं राहिलीं दुःखें उदासी आयु हें झालें ! ३

मनाची तूच विश्रांती जिवाची तूंच गे शांती
धरित्री, स्वर्ग दोघांची मधें तूं साखळी होती ! ४

घनाचे खंड हे पाहा निळ्या या अंबरामाजी
करीती चित्त भगाच्या स्थितीला स्पष्ट ते आजी ! ५

उठावे जेथ रोमांच तिथें हे बोंचती कांटे
कळी तू कल्पवृक्षाची पुन्हा ना लाभशी वाटे ! ६

शुभेच्छा कल्पवृक्षाची सदिच्छा कामधेनूची
तुझ्या त्या मधुर सहवासीं कधीं ना स्पर्शली साची ! ७

मिळे जों प्यावया इष्ट तुझा तो कंठ-मकरंद
सुधेला वाञ्छिलें नाहीं कुठें तो आज आनंद ? ८

फुलें त्वां गुंफुनी माला कितीदां घातल्या कंठीं
अतां या अश्रुमालेला वहातों मी तुझ्यासाठीं ! ९

मनोज्ञे ! का तुझ्यासाठीं उडोनी येउ आकाशीं
गमे हा भार देहाचा घडावी भेट गे ! कैशी? १०

# ते मुख. !

( वृत्त-दिंडी )

१

चंद्रवदनेचा चारु देहकर्ता
चतुर चतुरानन मजसि गमत होता
विकर्मिक विधि का तोच आज व्हावा ?
हय तें मुख तलाश कां करावा ?

२

चंद्रिकेनें चंद्रास महति येई
चपल चपलेनें प्रेक्ष्य जलद होई
तसा ज्यानें मी भाग्यवंत होतों
अतां तें मुख दैन्यांत आठवीतों !

३

शशीसम तें, त्यासमहि शशि विराजे
नलिनिसम तें, तत्सदृश नलिनि साजे
शशी नलिनी आहेत; तेंच नाहीं !
मला तें मुख वदण्यास 'हाय' लावी

फुलें त्वां गुंफुनी माला कितीदां घातल्या कंठीं
अतां या अश्रुमालेला वहातों मी तुझ्यासाठीं ! ९

मनोज्ञे ! का तुझ्यासाठीं उडोनी येउ आकाशीं
गमे हा भार देहाचा घडावी भेट गे ! कैशी ? १०

---

# तें मुख. !

( वृत्त-दिंडी )

१

चंद्रवदनेचा चारु देहकर्ता
चतुर चतुरानन मजसि गमत होता
विकर्मिक विधि का तोच आज व्हावा ?
हृद्य तें मुख तन्नाश कां करावा ?

२

चंद्रिकेनें चंद्रास महति येई
चपल चपलेनें प्रेक्ष्य जलद होई
तसा ज्यानें मी भाग्यवंत होतों
अतां तें मुख दैन्यांत आठवीतों !

३

शशीसम तें, त्यासमहि शशि विराजे
नलिनिसम तें, तत्सदृश नलिनि साजे
शशी नलिनी आहेत; तेंच नाहीं !
मला तें मुख वदण्यास 'हाय' लावी

४

जनालागीं सुख मासपौर्णिमेचें
गृहीं माझ्या ती पौर्णिमाच नाचे
विषम विरहाचें गाढ तिमिर आतां
धवल तें मुख अस्तास आज जातां !

५

मलयमारुत जरि मंद मंद आला
तप्त देहाला शातवावयाला
त्यास सोडोनी ज्यास आदरावें
कसें तें मुख वर्णून दाखवावें ?

६

सुमोपवनाचा सौरभ-प्रमोद
शरत्कौमुदिचा शुभ्र सदानद
तसा होई यद्दर्शनात तोष
साश्रु करि तें आजि मुख विलोचनास !

७

कधिं न पाहियलें देव-सुंदरींना
कधीं नाहीं देखिलें अप्सरांना

तरी जें दे तत्कल्पना मनाला
कधीं तें सुख लाधेल पाहण्याला !

८

मह्न्मंडन कांहींहि नको ज्यातें
स्वयंसुंदर जणुं तेंच रत्न होतें
भूषणांना जें भूषणीय झालें
कुणी घडिलें, तें सुख विनष्ट केलें ?

९

हरी ताप ध्वनिवीण-दर्शनानें
हरी श्रमही कृतिवीण-स्वरूपानें
मोद देई जें केवळ स्मितानें
कुठें गेलें ? तें सुख ? न कांहीं नेणें.

१०

जीविताचें तें वाटलें निधान
सौख्य-शांतीचें रम्य नव-स्थान
कळेना कीं आंतून कोण बोले
'कुणीं तें सुख पुसतां न कुठें नेलें ?'

११

भास होई, प्रत्यक्ष दिसत नाहीं.
ध्यास लागे जीवास, सुचत नाहीं.
जीवितातिल सुख वाटलें गळालें
रम्य तें मुख मज वेगळें जहालें!

१२

काव्य–गीता घेऊन तीस पाहीं
कृष्ण-गीता ही वाचियिली कांहीं
हृदय–गीतेचा शब्द हाच बोले
कधीं तें मुख हे पाहतील डोळे?

१३

बरा वडवानल, उदधि ज्यास साही
बरें हालाहल, शंभु कंठिं वाही
परी विरहानल दु:सह प्रसिद्ध
हरुनि तें मुख विधि होय मज विरुद्ध!

# विरक्त

( शा० वि० )

मी तों आत्म गुणाभिमान गिरीच्या उत्तुंग शृंगावरी–
बैसोनी अवमानिले गुणवती तूंतें विनोदांतरी
त्वां शाते ! चतुरे ! हसून दिधलें सप्रेम जें उत्तर
देवी ! त्यात भविष्यसिंधु भरला होता महा दुस्तर.

२

मातें आठवतात शद्व मम ते, बोलू तरी गे कसे ?
कंठीं मात्र भविष्यवाणि तव ती मी नित्य घोळीतसे
तो काल, स्थल तें, मनोहर तुझी ती मूर्ति आनंदिनी
माझें दुःख दुणावितात, गळती धाराश्रु मल्लोचनीं.

३

होती सनिध त्या विनोद समयीं साध्वी ! तुझी मैत्रिण
सत्यार्थास तुझ्याच जी अनुमती देई तदा हांसुन
दृष्टादृष्ट तिची क्वचित् जरि घडे मी पाहतों खालतीं
तीही त्या स्मृतिनें सकंप हृदयीं होते पर्थी सप्रती

४

आतां ऊर्वशि अप्सराहि उतरो ती इन्द्रलोकांतुन
होतों सेवित सत्सुखास भुवनीं गेले अहा ! ते दिन
मी प्राप्त स्थितिलाच पूज्य गणितों जी त्वत्स्मृती देतसे
संसारीं असुनी विरक्त बनलों आयुष्य कंठीतसे !

# निश्वास !

( अश्वघाटी-वृत्त )

देवी गतश्वास होऊन, विश्वास सोडी,
अविश्वास वाटे मनीं
गेला अविश्वास, मी सोडि निश्वास,
नाहीं समाश्वासनाला कुणी
नौका तळाशीं बुडाली, प्रवाशी-
भयाभीत पाही दिशाशीं जसा,
माझ्या जिवाशींच ठावा, कुणाशीं-
विधी काळ नाणो विदेशीं असा.

२

सर्वांग-सौंदर्य-सर्वार्थेना सादर
सारसाक्षी समालोचनीं
सन्नीति-संयुक्त-संभाषिणी सन्निकृष्ट-
स्थितीमाजि संतोषिणी
संताप-संताप-समर्दिनी सौख्य-
संतर्पिणी स्वर्गसंचारिणी •
संतोष-संपत्ति-संवाहिनी संत-
संभाविनी संगसंमोहिनी !

३

सर्वत्र सत्प्रीतिसंपादिनी सत्य-
संवादिनी स्नेहसंरक्षिणी
सावित्रीसीतादि-सच्छील-सीमंतिनी-
सत्वरूपा-सदावर्तिनी
संसार-संगास सोडी सती सार-
हीनत्व सारें समालोकुनी
साध्वीप्रिये सारखी संपली स्निग्धलीला
सखीची स्मृतीदायिनी !

४

मुक्तावलीची प्रभा फांकली,
चंद्रिका मूर्तरूपास कीं पावली ?
स्वर्गांतली मल्लिकेची कळी
देवकर्णावरोनी गळाली तळीं ?
भूमिस्थळीं उज्वला पातली शुक्रतारा
जणो काय व्योमांतलीं-
ती जेथल्या तेथ गेली, जळीं वाहते
मात्र मन्नेत्र धारावली !

५

गेली मनोमोहिनी, टाकुनी मोहिनी,
प्रीतिची ती सुधा वाटुनी
रात्रदिनीं चिंतनी खेळुनी राहते, का
दिसूनी न ये लोचनीं ?
स्वर्वासिनी जाहली, एकवेळा
गृहस्वामिनी होति जी कामिनी
निश्वास सोडून सोडून भागे
निधनाच हा जीव मोहांतुनी !

६

गेहाकडे पाहणें नावडे, दु:ख शोकीं
बुडें, चित्त हें बापुडें
कैसें रडें थांबवू मी गडे !
अश्रुचे हे सडे घालुं कोणापुढें ?
भ्रांती जडे, मार्ग ना सांपडे,
जाहलें वांकडे बुद्धिचें पारडें
हे कोरडे लोक देती धडे,
पीळ ज्याला पडे, दु:ख त्याला घडे !

७

बाहेरुनी गेहिं यावें क्षणी, जीव
    जावा दमोनी श्रमा साहुनी
दारांतुनी नीलदृष्टीस फेंकीत
    मोहीत होती प्रसन्नाननीं
ती झोंपतां जाउनीया स्मशानीं
    स्मशानापरी गेह झालें त्वरीं
रामेविना राम नाहींच संसारिं
    आराम वाटेल कैसा तरी?

८

लागे निजध्यास जीवास
    आभास तेणेंच होतात निद्रांतरीं
देवांगना काय गौरांगना कीं
    नभःप्रांगणातून ये भूवरी
केव्हां दृढालिंगनानें कदा
    अश्रु–संमार्जनानें हरी सुंदरी
होळी पुन्हां पेटते जागृती–
    माजि येताच दुःखानलाची परी!

९

दुर्दैव मोठें ललाटांत खोटें
पुसायास कोठें तरी जाउं मी ?
जें दुःख दाटे, तयें ऊर फाटे,
कुणीही न भेटे मनःसंयमीं
हा शोक वाटे गळे अश्रुवाटे
सुखामाजि कांटे कुणीं पेरिले ?
मी क्लेशलाटेसवें काळ लोटें
विचारास फांटे किती लागले !

# मनःसांत्वन

( शिखरिणी )

१

तिचें चित्ता आतां स्मरण करुनी काय फळ तें ?
वियोगाची बाष्पावलि नयनिं ही मात्र भरते !
दुज्यानीं सांगावें परि तुजसि हें सर्व कळतें
'निघोनी जी गेली पुनरपि न ती मूर्ति दिसते'

२

खरे आनंदाचे दिन तिजसवें मात्र गमले
अतां अंतर्दुःखें सहन करणें हेंच ठरलें !
मना मोठे मोठे सुजन परि बा ! काय म्हणती
'विवेकें दुःखाचे हिमगिरि महाही वितळती'

३

लिहूनी प्रीतीचे अमरपट गेली गुणवती
कसें ते दावावे उघड करुनी काय दिसती
न येई झालेली जखम भरुनी सज्जन मना !
'पुढें जी आली ती सहन करणें दैव-घटना'

४

जिनें संसाराचा सुखकर बगीचा उभविला
कुठें गेली, कोठें लपुन बसली आर्य-महिला
जगत्सिद्धांताचा गहनहि असा भाग समजे
' कुणालाहि कोडें जनन-मरणाचें न उमजे. '

५

जिच्यासंगें केला निबिड विपिनीं वासहि जरी
तिथेंही जी देवी अनुपम सुखें दिव्य वितरी
तिचा आहे चित्ता विरह सहणें भाग तुजला
' शहाणा तोची कीं विपदिं मिळवी शांति अतुला '

६

तिला जावें कष्टें विसरुनि असेंही ठरविलें
परंतू नेत्रांच्या पुढुनि मुख तें लेश न चळे
पना संमोहाच्या निधितुनि कसा कोण उतरी !
' तपस्वी लोकांही भ्रमित करिती मोह-लहरी '

७

अधिष्ठात्री होती मम सु-कवितेची गुणवती
पदाच्या लालित्यें मन हरित होती गजगती
विधात्यानें नेली उचलुनि कुणाला न पुसतां
'कुणालाही येई विधिवरि न फिर्याद करितां'

—*×*—

समाप्त

REFBK-0003445

# तिवारींचीं पुस्तकें

| | | |
|---|---|---|
| × * | १ काव्यकुसुमांजलि [ शिल्लक नाहीं ]... ... | ॥= |
| * | २ काव्यरत्नमाला ... ... ... | २॥ |
| * | ३ मनोहर लीला [ खंडकाव्य ] ... ... | ।= |
| × * | ४ प्रसन्नराघा " ... ... | ।= |
| × * | ५ महाराणा प्रतापसिंह " ... ... | ॥ |
| * | ६ मान्याची यमुना " ... ... | ।= |
| | ७ अभंगमाला... ... ... ... | । |
| | ८ राधामाधव ... ... ... ... | ॥= |
| | ९ मराठ्यांचीं संग्रामगीतें ( आवृत्ती ३ री ) ... | ॥= |
| | १० झांशीची संग्रामदेवता ( आवृत्ती २ री ) ... | ॥ |
| | ११ चंडीशतक ... ... ... ... | ॥। |

* हीं बुकें मुंबई विद्याखात्यानें मंजूर केलीं आहेत.

१।२।५।६।७ या नंबरचीं बुकें नागपूर विद्याखात्यानें मंजूर केलीं आहेत.

पहिल्या ७ बुकास महाराष्ट्र प्र. मंडळ इंदूर या संस्थेनें बक्षिसें दिलीं आहेत.

× या बुकांस दक्षिणाप्राइझ कमेटीनें बक्षिसें दिलीं आहेत.

दु० आ० तिवारी

जळगांव पू० खा०

# काव्यकिरणमाला.

---

( सं० व प्र० मि. का. भोरटके )

वर्गणी ५॥ रु०

वरील वर्गणींतून ।॥। प्रवेश फी वजा जातां बाकीच्या ४॥। रकमेची फेड सरासरी दर २ महिन्यानें पुस्तक रूपानें केली जाईल. मालेंतील पुस्तकांची किंमत । पासून ।॥। पर्यंत ठेविली जाईल. व मालेच्या ग्राहकांस मालेचें प्रत्येक पुस्तक तीन चतुर्थांश किंमतीस मिळेल

मालेंतून आतांपर्यंत नियमितपणें पुढील पुस्तकें प्रकाशित झालीं आहेत.—

(१) महाराणा प्रतापसिंह ।॥। (२) मान्यांची यमुना ।=. (३) चंडीशतक [ बंध प्रबंधाचें पुस्तक ] ।॥। (४) कविता-वनिता ।॥। हीं सर्व पुस्तकें महाराष्ट्र शाहीर श्री० कवि तिवारी यांचीं आहेत

मि. का. भोरटके

जळगांव पू० खा०

# काव्यरत्नावली मासिक

हे काव्यरत्नावली मासिक पुस्तक आज ३५ वर्षे निघत आहे. निव्वळ मराठी कवितेस वाहिलेलें असें हें एकच मासिक पुस्तक हिंदुस्थानांत आहे. यांत हल्लींच्या नामांकित मराठी कवींच्या मराठी कविता व काव्यें येतात. तसेंच प्रत्येक अंकात एक एक कवीचें चरित्रही येत असतें. शिवाय प्रत्येक स्वर्गस्थ व हयात कवींचे फोटोही देण्याची तयारी चालू आहे. आजपर्यंत या मासिकात लाख दीड लाख कविता प्रसिद्ध झाली असून दरसाल कविता व काव्यें मिळून अजमासे दोन हजारपर्यंत कविता छापून निघते. पहिल्या अमदानींत जे केशवसुत, विनायक कवि टिळक, बालकवि, माधवानुज, गोविंदाग्रज (गडकरी), मुजूमदार, वा. दा. ओक, आगाशे, गणेश शास्त्री लेले, वासुदेव शास्त्री खरे, रिजवूड, बापूसाहेब कुरुंदवाडकर, कानिटकर, वगैरे जे प्रासादिक कवि होऊन गेले त्यांची सर्वोत्कृष्ट काव्यें व कविता यांचा संग्रह मागील वर्षांच्या बांधलेल्या व्हॉल्यूममध्यें येऊन गेला आहे. एकंदर गेल्या तीस पस्तीस वर्षांतील सर्व कवींची एकत्रित कविता याच मासिकात काव्यप्रिय वाचकास वाचावयास मिळेल. क्रौन साईज ३२ पृष्टाचा अंक दर महिन्यास निघतो. वर्षारंभ जुलैपासून असतो केव्हाही वर्गणीदार होतां येतें. आरंभापासून अंक मिळतात. वार्षिक वर्गणी टपाल व्ही. पी. सह दोन रुपये मागील १८ वर्षांचीं बांधलेलीं पुस्तकें विक्रीस तयार आहेत हीं फारच थोडीं राहिलीं आहेत अगदीं स्वस्त किंमतींत मिळतात. काव्यप्रिय वाचकांनीं ही संधी दवडूं नये.

नारायण नरसिंह फडणीस
संपादक काव्यरत्नावली
जळगांव पू० खा०